# पेत्राचे पहिले पत्र

# (THE BOOK OF FIRST PETER)

# पेत्राचे पहिले पत्र

**१** पेत्राकडून जो येशू ख्रिस्तांचा प्रेषित आहे, त्या सर्व परदेशवासियांच्या नांवे जे गलतिया, कप्पदुकिया,
२ आशिया व बिथुनिया येथे **अस्थायी** अवस्थेत राहत आहेत. जे देवपित्यांच्या ज्ञानानुसार आणि
पवित्रात्म्याच्या पवित्रीकरणाद्वारे, येशु ख्रिस्तांची आज्ञा पालन करण्यासाठी त्यांनी दिलेल्या रक्ताद्वारे
३ निवडले गेले आहेत. त्या तुम्हाला अधिक प्रमाणात कृपा व शांति प्राप्त होवो. **आपल्या** प्रभु येशु

---

**अध्याय १**

**१:१ –** ***"प्रेषित"*** – मत्तय १०:२

***"परदेशवासी"*** – २:११; इब्री ११:९,१३ ख्रिस्तांवर विश्वास ठेवणाऱ्यांना, या जगाविषयी आपुलकीची भावना नसते कारण त्यांची नागरिकता स्वर्गात आहे, म्हणजेच ते स्वर्गाचे नागरिक आहेत या जगाचे नाहीत. (फिलि ३:२०).

***"अस्थायी अवस्था"*** – पेत्र ग्रीक भाषेतील 'डायस्पोरा' या टेकनिकल शब्दाचा उपयोग करतो, ज्याचा अर्थ, असे यहूदी जे पॅलेस्टाईनच्या बाहेर निवास करत होते. (योहान ७:३५). पेत्र त्याच लोकांना लिहित होता जे ख्रिस्तांचे शिष्य झालेले होते. पेत्र यहूदयांसाठी एक प्रेषित होता. (गल २:७,८) या पत्रात पेत्र, यहूदी ख्रिस्ती लोकांना काही महत्वाचे निर्देश देतो. पेंटेकॉस्टच्या दिवशी त्यांपैकी काही लोकांनी शुभ संदेश ऐकला असावा, असे वाटते. (प्रेषित २:९). ***"पंत...बिथुनिया"*** हे सर्व सध्याच्या/आजच्या तुर्कस्थानात होते.

**१:२ –** ***"निवडले गेले आहेत"*** – मत्तय २४:२२,२४,३१; योहान १७:६; इफि १:४

***"देवपित्यांच्या ज्ञानानुसार"*** – रोम ८:२९ चे नोट्स पहा. आणि रोमकरांस च्या शेवटी असलेले नोट्स पहा. या वचनात त्रिएकत्वातील तीन व्यक्ति पहा. (मत्तय ३:१६,१७ याचे नोट्स) येथे विश्वासूंच्या मुक्तिविषयी अनेक गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत. आपण यांचे कारण व प्रारंभ पाहतो : परमेश्वर बापांची निवड. आपण याची पद्धत व प्रक्रिया पाहतो : आत्म्याचे कार्य. आपण याचा हेतू व लक्ष्य पाहतो : येशू ख्रिस्तांप्रति आज्ञापालन. आपण याचे माध्यम व आधार पाहतो : येशू ख्रिस्ताचे पवित्र रक्त.

२ थेस्स २:१३,१४ शी तुलना करा.

***"पवित्रीकरण"*** – योहान १७:१७-१९ यात पवित्रीकरणाविषयी नोट्स पहा. लेवी २०:७ सुद्धा पहा. परमेश्वर पित्यांचा आत्मा या जगात, प्रत्येक विश्वासूला इतरांपासून वेगळा करतो, पापाविषयी अस्वस्थ व बेचैन करतो, अंतःकरण परिवर्तनाच्या सीमेजवळ आणून नवीन आत्मिक जीवन देतो व सत्याविषयी शिकवतो. (योहान ३:५-८; १६:७-१५).

***"आज्ञा पालन"*** – ***"येशू ख्रिस्तांप्रति एखादयाला आज्ञाधारक बनवणे"*** हाच परमेश्वरांच्या बोलावण्याचा हेतू असून ते परमेश्वराच्या आत्म्याचे कार्य देखील आहे. प्रेषित २२:१० चे नोट्स पहा. या गोष्टीकडे लक्ष दयावे की, हे सर्व येशू ख्रिस्तांच्या रक्त सिंचना/शिंपडण्यापूर्वी पासूनच आहे. त्यांचा स्वीकार पुत्र व सोडवणारा या रूपात करत असल्यामुळे आपण त्यांच्या रक्ताद्वारे धुतले जातो आणि त्यामुळेच वेगळे केले जातो. मात्र यानंतर देवबाप आपल्या कडून, संपूर्ण जीवन, प्रेमाने प्रेरित अशा आज्ञापालनाची अपेक्षा नेहमीच करतात. (योहान १४:१५,३३; रोम १:५)

***"शिंपडण्याने किंवा सिंचनाने"*** – जुन्या करारात पशुंचे रक्त शिंपडले जाणे, तीन गोष्टी दर्शवतात.

१) शुद्ध केले जाणे (लेवी १४:१-७)

२) याजकांचे वेगळे केले जाणे (निर्ग २९:२०-२२)

३) परमेश्वर पित्यांच्या प्रतिज्ञेची पुष्टी (निर्ग २४:१-८) येशूंच्या रक्ताद्वारे विश्वासू क्षमा केले गेले व त्यांचे अपराध धुतले गेले (इफि १:७, इब्री ९:१४; १ योहान १:७) मध्यस्थांच्या रूपात विश्वांसूना देवबापासमोर पूर्ण सूट मिळालेली आहे. (इब्री १०:१९-२२) आणि या सोबतच ते नवीन प्रतिज्ञेचे भागीदार/वाटेकरी केले गेले आहेत. (मत्तय २६:२८; इब्री १२:१४).

**१:३ –** ***"परमेश्वर आणि पिता"*** – इफि १:३

खिस्तांचे परमेश्वर आणि पित्यांचा धन्यवाद असो ज्यांनी येशू ख्रिस्तांच्या पुनरूत्थानाद्वारे आपल्या
४ असीमित कृपेने आम्हाला जिवंत आशेत नव्याने जन्म दिला आहे. **अर्थात** एक अविनाशी, स्वच्छ
५ निर्मळ आणि अमर वतन जे तुमच्यासाठी स्वर्गात राखून ठेवलेले आहे. **हे** लोक देवबापांच्या
सामर्थ्यामुळे, विश्वासाद्वारे अशा तारणासाठी तयार केले आहेत जे भविष्यात, येणाऱ्या काळात प्रगट
६ होणार आहे. **याच** कारणामुळे जरी यात तुम्ही मग्न होऊन आनंद करता, तरीपण हे अवश्य आहे

---

*''कृपा''* - तीताला ३:५; इफि १:३

*''नवीन जन्म''* - योहान १:१३; ३:३-८. इफि २:५; याकोब १:१८; १योहान ३:९; ४:७; ५:१.

*''जिवंत आशा''* - रोम ५:२; ८:२४,२५; तीताला १:२.

*''पुनरूत्थानाद्वारे''* - मत्तय २८:६; प्रेषित १:३; २:२४; रोम १:४; १करिं १५:१२,१९.

**१:४** - *''वतन''* - मत्तय २५:३४; प्रेषित २०:३२; इफि १:१४; कल १:१२; इब्री १:१४; ६:१२; याकोब २:५.

नव्या जन्माच्या कारणामुळे, केवळ परमेश्वराच्या लेकरांना वतन प्राप्त होते. ख्रिस्तांसाठी जे लोक या जगाचा त्याग करत आहेत तेच लोक, स्वर्गात राखून ठेवलेले देवबापांचे वतन प्राप्त करतील. (मत्तय १९:२७-२९). सर्वप्रथम पाहिले तर, परमेश्वर स्वतःच एक *''वतन''* असे आहेत. (उत्प १५:१; यश १६:५; ७३:२५,२६; विलाप ३:२४) या नंतर इतर दुसऱ्या गोष्टी आपले वतन आहेत. (प्रकटी २१:७).

*''अविनाशी/नाश न होणारे''* - वतनाचा संबंध या सृष्टीशी किंवा एखादया नाशवंत, वस्तुंशी नाही. (१करिं १५:५०,५३), परंतु *''वतन''* हे अविनाशी असून सनातन/नेहमीचे आहे.

*''तुमच्यासाठी ठेवलेले आहे''* - म्हणजेच ते इतर/अन्य कोणीही घेऊ शकत नाही किंवा हिसकू शकत नाही किंवा चोरीही करू शकत नाही कारण देवबापांनी हे वतन फक्त विश्वासूंसाठी ठेवलेले आहे. ज्या कोणाचा असा विश्वास आहे की स्वर्गात त्याचे/तिचे वतन आहे त्या सर्वांनी जगातील प्रत्येक वस्तुंच्या मोहापासून दूर राहून त्याचा लोभहि ठेवू नये.

**१:५** - *''विश्वासाद्वारे केली जाते''* - ग्रीक शब्द जो सेनेत उपयोगी पडतो. परमेश्वरांचे सामर्थ हीच खरी सुरक्षा आहे. देवबाप सैन्यांचे परमेश्वर असून त्यांच्या अधिकाराखाली स्वर्गाची संपूर्ण सेना आहे. देवपिता विश्वासूंच्या सेवेसाठी, आपल्या सामर्थी देवदूतांना पाठवतात. (इब्री १:१४; स्तोत्र ९१:११,१२). या जगातील आणि त्यासोबतच अदृश्य आत्मिक संसारातील, गोष्टींचा प्रबंध परमेश्वराद्वारे केला जातो कारण ते तसे करू शकतात. याचे कारण हेच आहे की, अगदी शेवटपर्यंत विश्वासूंचे संरक्षण व्हावे व ते सुरक्षित वाचवले जावेत. (योहान ६:३९; १०:२८,२९). हे त्यांच्या पुत्राच्या प्रार्थनेचे उत्तर आहे. (योहान १७:११,१२; रोम ५:९,१०; इब्री ७:२५).

जर विश्वासू, आपल्या विश्वासाचे समर्थन करत नसेल, तर तो तारण गमवेल काय? देवबाप तर त्यांना विश्वासाद्वारेच वाचवतात. विश्वास हे परमेश्वरांचे वरदान आहे. (इफि २:८; फिलि १:२९). *''विश्वास''* हे परमेश्वरांच्या जवळ असलेले एक असे *''हत्यार''* आहे, की ज्याद्वारे ते विश्वासूशी संपर्क साधतात. हे एक सिद्ध वरदान असून परमेश्वरांनी आखलेल्या स्वर्गिक योजनेला पूर्ण करण्यास योग्य व सक्षम आहे. विश्वासूंना विश्वास दिल्यानंतर, तो विश्वास त्यांच्या हृदयात जिवंत व कायम ठेवण्यातहि परमेश्वर समर्थ आहेत. (लूक २२:३१,३२). काही काळासाठी जेव्हा आपला विश्वास डळमळतो तेव्हा देवबाप आपल्या विश्वासाचे नवीनीकरण करतात म्हणजेच नव्याने स्थिर करतात.

*''तारणासाठी जे भविष्यात, येणाऱ्या काळात''* - विश्वासू पाप करत असतांना किंवा त्याच्या अंतःकरणात शंकेचा विचार प्रवेश करत नसतांनाच, परमेश्वचर त्याचा सांभाळ करतात असे नाही, तर ते त्यांना तोपर्यंत सांभाळतील जोपर्यंत त्यांची मुक्ति पूर्णतेस पोहचत नाही. येथे पेत्र तारणाच्या व भविष्याच्या पैलूविषयी सांगत आहे. विश्वासूंनी उद्धार प्राप्त केलेलाच आहे यात शंका नाहीच. (योहान ५:२४; रोम ८:२४; इफि २:५; २तीम १:९; तीताला ३:५). ते सतत वाचवले जात आहेत. (१करिं १:१८; २करिं २:१५). ते वाचवलेहि जातील. (रोम १३:११; फिलि १:२८; इब्री १:१४; ९:२८).

**१:६** - *''मग्न''* अर्थातच आनंदित/उल्हासित. *''ख्रिस्तात आत्मिक आनंद होणे''*, हे एका खऱ्या ख्रिस्ती व्यक्तिच्या जीवनात असणाऱ्या अनेक चिन्हांपैकी एक आहे. परमेश्वरांच्या लोकांसाठी हे देखील एक प्रकारचे वरदानच आहे. हा आनंद, ती

७ की, काही काळ निरनिराळया प्रकारच्या परीक्षेमुळे/समस्येमुळे तुम्ही उदास व निराश व्हावे. **हे** अशा
कारणाने की, तुमचा पारखलेला विश्वास, अग्नित परीक्षा झालेल्या नाशवंत सोन्यापेक्षा, अधिक
मूल्यवान आहे. येशू ख्रिस्तांच्या पुन्हा होणाऱ्या आगमनाच्या वेळी प्रशंसा आदर व गौरवाचे कारण
८ व्हावे. **येशूंना** पाहिले नसले तरी तुम्हाी त्यांच्यावर प्रेम करता आणि आता तर ते दिसत नसले तरी
९ असे आनंदित व मग्न होता जे अवर्णनीय व गौरवाने परिपूर्ण आहे. **कारण** तुम्ही आपल्या

---

प्रसन्नता नव्हे, जी सर्व काही सुरळीत चालत असतांनाच आपल्या स्वभावातून प्रदर्शित होते, याउलट हा एकप्रकारचा अलौकिक आनंदच आहे जो नेहमी आपल्या स्वभावातून झळकत असतो. परंतु जर आपण या आनंदाचा अनुभव कधीच घेतला नसेल तर, हे या गोष्टीचे प्रमाण आहे की, आपण ख्रिस्तांवर पूर्ण निष्ठेने कधी भरंवसा ठेवलाच नाही. (योहान १५:११; १६:२४; १७:२३; प्रेषित ५:४१; ८:३९; १६:३४; रोम ५:२,३,११; १४:१७; २करिं ६:१०; ८:२; गल ५:२२; १थेस्स १:६). ''यात'' या शब्दाकडे लक्ष दया. हे शब्द त्या गोष्टींकडे संकेत करतात जे त्याने तिसऱ्या वचनात म्हटले आहेत. लेखक म्हणतो की आनंदाचे चार स्त्रोत/माध्यम आहेत :

पहिला - नवीन जन्म

दुसरा - जिवंत आशा;

तिसरा - स्वर्गात जपून ठेवलेल्या भविष्याच्या वतनाचे ज्ञान;

चौथा - आपल्याला सांभाळून ठेवणारे असे परमेश्वरांच्या सामर्थ्याचे आश्वासन.

***''जरी...आता''*** असे काही अनुभव आहेत जे आमच्या अंतःकरणातील परमेश्वरांच्या आनंदाच्या प्रवाहाला थांबवू शकतात. अपराध : (स्तोत्र ३२:३-५; ५१:३,४,८,१२). शंका : (मत्तय १४:२९-३१; लूक २४:३७,३८; याकोब १:६). चूक शिकवण : (गल ३:१-३; ४:१५-१७). पारखले जाणे/परीक्षेत पडणे : (इयोब ३:१-२६). तरीपण असे व्हावेच हे आवश्यक नाही. कठोर परीक्षेच्या काळातही ***''दृढ असणारा विश्वास''*** आनंदी होऊ शकतो. (प्रेषित ५:४१; २करिं १२:७-१०; कलस्सै १:२४; याकोब १:२). दुःख व आनंद एकाच वेळी होऊ शकतात. (२करिं ६:८-१०).

**१:७** - सोने अग्निद्वारे शुद्ध केले जाते व त्याची पारख त्यावरून केली जाते. याच कारणाने देवबाप विश्वासूंच्या जीवनात अग्निमय परीक्षेची परवानगी देतात. तुलना करा. स्तोत्र ६६:१०-१२. विश्वास सोन्यापेक्षा अधिक मूल्यवान आहे. ही खरोखर दुःखदायक गोष्ट नाही का की, लोक विश्वासाची उपेक्षा/दुर्लक्ष करून सोने व इतर जगातील वस्तूंच्या मागे लागतात? ***''विश्वास''*** स्वर्गातील अनंत धन प्राप्त करण्याचे माध्यम असल्यामुळेच इतका बहुमूल्य आहे.

***''पारखलेला''*** विश्वासाला पारखले जाणे/परीक्षा होणे. (येथे प्रयुक्त ग्रीक शब्द सहाव्या वचनातील ग्रीक शब्दांपेक्षा एकदम वेगळा आहे). यावरून स्पष्ट होते की, खरोखर आपण विश्वास करतो किंवा नाही, किंवा फक्त विचार करतो आणि केवळ तोंडाने म्हणतो. अग्नीमय परीक्षेतून जातांना जर आपण विश्वासत दृढ राहिलो व जगीक गोष्टींच्या आकर्षणात ओढले गेलो नाही, तेव्हाच सिद्ध होते की आपला विश्वास वास्तविक खराच आहे. तुलना करा (मत्तय १३:२१,२३; इब्री १०:३२,३९.)

**१:८** - ***''प्रेम''*** - योहान १४:१५; २१:१६; १करिं १३:७; १६:२२; गल ५:६. खऱ्या विश्वासाचे हे आणखी एक प्रमाण होय. सत्य-विश्वास व ख्रिस्तांवरील प्रीति, सोबत-सोबत वाटचाल करतात. जर यापैकी एक आपल्या जवळ नसेल तर, निश्चितपणे. दुसरा सुद्धा नसणार. ''न पाहून सुद्धा'' ज्यांना आपण कधी पाहिले नाही, त्यांच्यावर प्रेम करणे किंवा विश्वास ठेवणे शक्य आहे का? होय, हे शक्य आहे. येशूंचे वचन आपल्यांजवळ आहे, त्याचप्रमाणे त्यांचा आत्मा आपल्या विश्वासाला वास्तविक व खरा बनवतो.

''आनंदित'' - वचन ६, नहे ८:१०; स्तोत्र ४:७; १६:११; २१:६; २८:७; ४३:४; ८१:१; यश १२:३; ३५:६,१०; लूक २:१०; योहान १६:२०-२४.

**१:९** - ***''प्राप्त करता''*** वचन ५. पारखले जाण्यासोबतच विश्वासू तारणाचा अनुभव घेत राहिले आहेत या पलीकडेही ते विश्वासाच्या परिपूर्णतेचा अनुभव करत राहतील.

१० विश्वासाचे प्रतिफळ अर्थात आपल्या प्राणांची मुक्ती (स्वातंत्र/तारण) प्राप्त करता. **याच** तारणाविषयी
११ त्या संदेष्टयांनी, बुद्धिमत्तेने व हुशारीने आणि बारकाईने तपास केला होता. **त्यांनी** हया गोष्टीचा शोध
केला की येशूंचा आत्मा त्यांच्यात असून येशूंच्या दु:खाविषयी व त्यानंतर भविष्यात येणाऱ्या
१२ गौरवपूर्ण गोष्टींकडे इशारा करून त्याविषयी साक्ष देत होता. **संदेष्टयांवर** असे प्रगट केले गेले होते
१३ की, त्यांनी स्वत:साठी नव्हे तर तुमच्या सेवेसाठी हया गोष्टी कराव्यात.**त्या** गोष्टीची खबरबात आता
१४ तुम्हाला त्यांच्या द्वारे प्राप्त झाली ज्यांनी पवित्रात्म्याच्या मदतीने, जो स्वर्गातून पाठवला गेला, **तुम्हाला**

---

**१:१०** - ***"संदेष्टे"*** - जुन्या करारातील संदेष्टे (उत्पत्ति २०:७ चे नोट्स पहा) त्यांनी त्या कृपेविषयी लिहिले होते जी आता विश्वासणाऱ्यांसाठी उपलब्ध आहेत. त्यांनी लिहिलेले लेख येशू व त्यांच्या द्वारे येणारे तारण, याविषयीच्या भविष्यवाण्या, चित्रे, प्रकार व छाया या सर्वांनी भरलेले आहेत. लूक ४:१७-२१; २४:२५-२७; ४५:४७; योहान ५:३९,४६; इब्री ८:५; १०:१).

**१:११** - देवबापाच्या आत्म्याने, जुन्या करारातील संदेष्यांना ते सर्व लिहिण्याची प्रेरणा दिली ज्याविषयी ते स्वत: काहीही समजत नव्हते. त्यांनी त्याच्या स्पष्टीकरणासाठी स्वत:च्या लेखांचा बारकाईने शोध केला. लक्ष दया, येशूंच्या पृथ्वीवरील आगमनापूर्वीही ख्रिस्तांचा आत्मा या जगात होता. त्याच आत्म्याने येशूंच्या महिमेविषयी व दु:खाविषयी आधीपासूनच सांगितले होते. उदा. स्तोत्र २२:१-२१ यात त्यांच्या दु:खाचे वर्णन केलेले आहे, २२-३१ यात त्यांच्या गौरवाचे वर्णन आहे. हीच गोष्ट यश ५३ विषयीही सत्य आहे. वचन १-९ यात दु:ख तर वचन १०-१२ यश ५२:१३-१५ आणि ५४ यात गौरव.

**१:१२** - संदेष्टयांना देवपित्याने याप्रकारे प्रगटीकरण दिले होते की त्यांनी सांगितलेले भविष्य व वचने भविष्यात पूर्ण होतील, त्याचप्रमाणे असे ही की, याद्वारे संदेष्टे, भविष्यातील पीढींची सेवाच करत आहेत. जुन्या कराराद्वारे देवबापाने नवीन ख्रिस्ती विश्वासूंना निर्देश दिले होते. (रोम १५:४; १करिं १०:११). त्यांनी त्या सर्व गोष्टी (भविष्यवाण्या) सांगितल्या, ज्यांची घोषणा आजच्या काळात सुसमाचार प्रचारक या जगात करत आहेत. म्हणजेच येशूंचा मृत्यू, पुनरूत्थान आणि त्यांना गौरव प्राप्त होणे या सर्व गोष्टींचा प्रचार होत आहे. देवबापाने, स्वर्गातून पाठवलेल्या पवित्रात्म्याच्या सामर्थ्यानेच सर्व शुभवर्तमान प्रचारकांना प्रचार करायचा आहे. योहान १४:१६,१७; लूक २४:४९; प्रेषित १:४,५,८; २:१-४ असे वाटते की, विश्वासूच्या तारणासाठी येशू त्यांच्या आत्मा व परमेश्वर काय करत आहेत हे विश्वासूंना ठाऊक नाही तरीपण परमेश्वर त्यांना आता याविषयी शिकवत आहेत. (इफि ३:१०)

**१:१३** - या तारण संदेशाविषयी अधिक जाणण्यासाठी, जर देवदूत याविषयी किती अधिक उत्सुक असावेत, कारण हा मुक्ति संदेश फक्त आपल्यासाठीच दिला गेलेला आहे. यासाठीच आपल्याजवळ नवे अंत:करण असावे; (रोम १२:२; इफि ४:२३,२४) व ते आपण देवबापांच्या वचनांनी भरून टाकावे. ख्रिस्ती जीवन याच गोष्टीवर भर देते की, आपण विचार, मनन व अध्ययन याद्वारे, परमेश्वराने आपल्यासाठी जे काही प्रगट केले आहे ते नीट समजून घ्यावे. तुलना करा स्तोत्र १:२, ११९:२६,२७,३४,७३ इत्यादि. इफि १:१८; ३:१८; फिलि १:९,१०; कल १:९.

***"कार्यशील होण्यासाठी मनाची तयारी"*** - लांब वस्त्र कंबरेला बांधणे याद्वारे कार्य करण्याची मानसिक तयारी दशवली जाते. सचेत/जागृत - याचा अर्थ आत्मसंयम होऊ शकतो.

***"कृपा"*** - परमेश्वराने पूर्वीपासूनच विश्वासूंना कृपा दिलेली आहे पण अजूनही बरीच कृपा शिल्लक/बाकी आहे. (वचन ४; इफि २:७). जर आपण आपली आशा कृपेच्या प्रतिफळावर लावली असेल तर येणारे सर्व दु:ख आणि परीक्षा आपण आनंदाने सहन करू शकतो, कारण यामुळेच आपण योग्य व सक्षम होऊन येणाऱ्या सर्व परीक्षा व दु:खावर विजय प्राप्त करू शकतो.

***"येशू ख्रिस्तांचे प्रगट होणे"*** - वचन ७; मत्तय २४:३०; तीताला २:१३; इब्री ९:२८

**१:१४** - ***"आज्ञाधारक बना"*** - कारण परमेश्वर बापांची इच्छा हीच आहे. वचन २. रोम ६:१७,१८; २करिं २:९; २ थेस्स २:८;

***"सारखे/प्रमाणे"*** - रोम १२:२; ८:२९;

***"जुनी वागणूक"*** ***"वाईट इच्छा"*** - मत्तय १५:१९; रोम १:२४; ८:५; इफि २:१-३; उत्पत्ति ८:२१.

***"अज्ञानी अवस्थेत"*** - योहान १५:२१; प्रेषित ३:१७; १७:३०; १करिं १५:३४; इफि ४:१८; १तीम १:१३.

१५ आनंदाची बातमी सांगितली. या गोष्टी उत्सुकतेने पाहण्याची इच्छा देवदूतांना सुद्धा आहे **याच**
कारणाने आपल्या मनाला कार्य करण्यासाठी तयार ठेवून, सावध राहून, येशू ख्रिस्तांच्या प्रगट
होण्याच्या वेळी मिळणाऱ्या कृपेवर पूर्ण आशा ठेवा. ती आशा जी ख्रिस्तांच्या परत आल्यावर तुम्हाला
१६ मिळणार आहे. **आज्ञा** पालन करणाऱ्या मुलांप्रमाणे व्हा. आपल्या अज्ञानाच्या स्थितितील पूर्वी
आवडणाऱ्या गोष्टींविषयी इच्छा ठेवणारे बनू नका, तर जसे तुम्हाला बोलवणारे पवित्र आहेत
त्याचप्रमाणे तुम्ही सुद्धा प्रत्येक प्रकारच्या वागणुकीत पवित्र बना. लिहिले आहे की, पवित्र व्हा कारण
१७ मी पवित्र आहे. **कारण** ज्या देवबापाशी तुम्ही ''हे बापा'' असे म्हणून प्रार्थना करता ते पक्षपात करून
न्याय करत नाहीत, परंतु प्रत्येकाची कामें पाहून त्याप्रमाणे न्याय करतात, म्हणून आपल्या प्रवासाच्या
१८ काळात परमेश्वरांना भिऊन वागा. **कारण** तुम्हाला ठाऊक आहे की, तुमची भ्रष्ट वागणूक पूर्वजांपासून
चालत आलेली आहे आणि त्याद्वारे तुमचे तारण चांदी, सोने अशा नाशवंत वस्तूंनी मिळालेली नसून
१९,२० **निर्दोष** व निष्कलंक कोकरा अर्थात येशू ख्रिस्त यांच्या रक्ताने प्राप्त झालेली आहे. **त्यांचे** (देवबापाचे)
२१ ज्ञान तर जगाच्या स्थापनेपूर्वी पासून जाणले गेले होते परंतु आता या शेवटच्या काळात तुमच्यासाठी

---

**१:१५,१६** - लेवी २०:७; यश ६:३; योहान १७:१७,१९; रोम ६:१९,२२; २करिं ७:१; इफि ४:२४; इब्री १२:१०,१४. एका विश्वासूचे हेच लक्ष्य असावे.

*''प्रत्येक वागणूक''* - जीवनाचे पवित्र आणि अपवित्र असे दोन भाग करू नये. विश्वासूंसाठी संपूर्ण जीवन पवित्र आहे.

**१:१७** - *''बापा''* - मत्तय ५:१६ चे नोट्स पहावे.

*''पक्षपात न करता''* रोम १२:११; इफि ६:९; कल ३:२५;

*''परदेशी अवस्थेत''* - वचन १, विदेश होऊन राहणे, घराबाहेर राहणे.

*''भय''* - २:१७; उत्प २०:११; ईयोब २८:२८; स्तोत्र ३४:११-१४; ८६:११; ९०:७-११; १११:१०; नीति १:७; प्रकटी १४:७; १५:४; १९:५. खऱ्या परमेश्वराप्रति असलेले ते भय जे त्यांना सदैव प्रसन्न करू इच्छिते. आदर व अशी भक्ति जी सत्य परमेश्वराचा कधीच अनादर करत नाही. हेच आत्मिक जीवनाचे केंद्र आहे. त्याला सोडून आपण खरे नीतिमान जीवन व्यतित करू शकत नाही. अशा प्रकारचे भय आपल्याला वाईटापासून वेगळे ठेवते तसेच चांगली कामे करण्याची व देवबापाची उपासना करण्यासाठी प्रेरित करते. म्हणून या विषयी बायबलमध्ये आज्ञा दिली गेली आहे (२:१७; प्रकटी १४:७).

**१:१८** - *''मुक्ति स्वातंत्र''* - स्तोत्र ७८:३५; मत्तय २०:२८ चे नोट्स पहा.

*''वाईट वागणूक''* येशूंपासून दूर राहिल्यामुळे पूर्वी आपले जीवन असे होते. जीवन तसेच आहे. (बायबल विषयी अज्ञानी लोकांचा जरा असा विचार नसेल) तुलना करा. सभो १:२; २:११. जागतिक गोष्टींनी परिपूर्ण होणे म्हणजे रिकामे /रिक्त राहणे. आपल्यातील कोणी अशा प्रकारच्या रिकामेपणाचा अनुभव करतो काय? तर, ख्रिस्तांकडे या. तेच आपल्या जीवनाला अर्थ, उद्देश्य व आशा प्रदान करतील.

**१:१९** - आमचा सुटकारा करण्यासाठी व आपले बनवण्यासाठी देवबापांनी किंमत दिली/मूल्य दिले. (मत्तय २०:२८; २६:२८; प्रेषित २०:२८; रोम ३:१८,२५) हे खरोखर अनमोल आहे, शब्दांनी त्याचे मोल मोजता येत नाही.

*''कोकरा''* - योहान १:२९.

*''निर्दोष व निष्कलंक''* - २:२२; इब्री ४:१५; ७:२६; निर्ग १२:५; लेवीय १:३. येशूचे रक्त वाहिले नसते तर कोणीही तारण प्राप्त करू शकले नसते. (इब्री ९:२२).

**१:२०** - जगाच्या उत्पत्ति पूर्वी, व मानवाने पापात पडण्यापूर्वीच, परमेश्वरांजवळ एक योजना होती व येशू त्या योजनेचे केंद्रबिंदू होते. तुलना करा इफि १:१४; प्रेषित २:२३.

**१:२१** - *''त्यांच्याद्वारे''* - पेत्र म्हणतो की, केवळ खिस्तांद्वारे, मनुष्य जिवंत परमेश्वरावर विश्वास ठेवतो. जरी येशूशिवाय

२१ प्रगट केले गेले आहे. **तुम्ही** जे त्यांच्याद्वारे त्या परमेश्वरावर भरंवसा ठेवता, ज्यांनी येशूंना मेलेल्यातून
उठविले आणि त्यांचे गौरव केले, या कारणाने की तुमचा विश्वास व आशा देवबापावर असावी.
२२ **म्हणून** जेव्हा तुम्ही भाऊबंदासाठी निष्कपट प्रेमाखातिर सत्यतेचे पालन केल्यामुळे आपल्या
२३ अंतःकरणांना शुद्ध केले आहे तर तन-मनाने एकमेकांवर खूप अधिक प्रेम करा. **कारण** तुम्ही
नाशवंत नव्हे तर अविनाशी बीजापासून म्हणजेच देवबापांच्या जिवंत व सदाकाळ टिकणाऱ्या शब्दांपासून
२४ नवीन जन्म प्राप्त केला आहे. **कारण** प्रत्येक मनुष्य गवताप्रमाणे आहे व त्याची सौंदर्य गवताच्या
२५ फुलासारखे आहे. **गवत** वाळते व फूल गळते परंतु येशूंचे शब्द सर्वकाळ टिकून राहतील आणि
हीच आनंदाची बातमी तुम्हाला सांगण्यात आली आहे.
**२**,२ म्हणून सर्व प्रकारची शत्रूता, चलाखी, कपट, हेवा व बदनामी यांना दूर ठेवा. **नवीन** जन्मलेल्या

---

ज्यांना वाटत असले की, ते परमेश्वरावर विश्वास ठेवतात, तरी खरे पाहता, ते तसे करत नाही.

***"त्यांना...आदर दिला"/गौरव केले".*** प्रेषित २:३२,३३; ३:१३; योहान १७:१. देवपित्याने येशूंना मेलेल्यांतून जिवंत केले, याच एका कारणाने सर्वांना जिवंत परमेश्वरांवर विश्वास व आशा ठेवणे हे शक्य झाले. वचन ३.

**१:२२** - आपण केवळ एकाच पद्धतीने पवित्र व शुद्ध राहू शकतो व ती म्हणजे बायबलमध्ये प्रगट केलेल्या देवबापांच्या सत्यतेद्वारे दाखवलेली पद्धत. तुलना करा. रोम ६:१७-१९; योहान ८:३१,३२. शुद्धिकरणाचे प्रतिफळ ***"खरे-सत्य प्रेम"*** होय. जर स्वर्गिक परमेश्वरांच्या लोकांसाठी आपल्या हृदयात प्रेम नसेल तर त्याचा अर्थ असा होतो की, आपल्या अंतःकरणात वास्तविक ***"पवित्रता, तारण"*** यापैकी काहीच नाही. १योहान ३:१४; योहान १३:३४. विश्वासूंच्या अंतःकरणात एकमेकांसाठी कशाप्रकारचे प्रेम असावे ते येथे पहा म्हणजेच ***"खरे, तीव्र व शुद्ध प्रेम".***

१:२३ ***"नवीन जन्म"*** - वचन ३; योहान १:१३; देवबापांचे वचन हे एक अविनाशी बी आहे. नवा जन्म देवपित्याच्या वचनाद्वारे येतो व ते बी मानवाच्या अंतःकरणात पेरले जाते. (याकोब १:१८)

१:२४,२५ यशया ४०:६-८. मनुष्य जे काही परमेश्वराशिवाय/त्यांना सोडून करतो किंवा करू शकतो, ती गोष्ट नेहमी स्थायी राहत नाही. परमेश्वरांचे वचन (व त्या वचनाद्वारे ज्यांनी नवीन जन्म प्राप्त केला आहे ते) सदाकाळ स्थिर/दृढ राहतील. मत्तय २४:३५; १योहान २:१७.

### अध्याय २

**२:१** - इफि ४:२५,२९,३१; कल ३:५-१० यात सांगितलेल्या सर्व गोष्टी जुन्या स्वभावातील आहेत व विश्वासूंच्या जीवनात या जुन्या स्वभावाच्या गोष्टींना कोणतेच स्थान प्राप्त होऊ नये. (गल ५:१९-२१).

**२:२** - ***"नवीन जन्मलेल्या बाळांनो"*** - या ठिकाणी कदाचित तो नव्या विश्वासूंसंबंधी विचार करत असावा; किंवा तो जुन्या विश्वासूंना धिक्कारित/ टोमणे देत असावा, की ते आपल्या ख्रिस्ती जीवनात किती मंद गतीने उन्नति करत आहेत. (तुलना करा १करिं ३:१,२; इब्री ५:११-१४). किंवा तो असे सांगत असावा की, ख्रिस्तांच्या दुसऱ्या आगमनानंतर आपण जे काही असू, त्याच्या तुलनेत आज आपण आत्मिक बालके आहोत. (तुलना करा. मत्तय १८:३). शिशु काळातील/ बालपणातील तीन गुणांना आपण सदैव टिकवून ठेवावे : (१) आत्मिक पोषणाची इच्छा. (२) अबोधता किंवा निरागसपणा, साधेपणा. (३) देवबापावर अवलंबून राहणे.

जर आत्मिक गोष्टींसाठी आपण भुकेले नाही, किंवा देवबापांच्या वचनाची आपल्याला भूक नाही, तर तसे जीवन **"आत्मिक जीवन"** नसण्याचे चिन्ह नाही काय?

***"निर्मळ दूध"*** - शुद्ध म्हणजेच भेसळ नसलेले. ज्या दूधाची आपल्याला गरज आहे ते म्हणजे परमेश्वरांच्या वचनाची शिकवण व शिक्षण. नव्या व जुन्या अशा दोन्ही प्रकारच्या विश्वासूंनी या दुधाची तहान-भूक ठेवावी. (स्तोत्र ११९:४०,१३१).

***"वाढत जावे"*** - इफि ४:१३-१५

बाळासारखी निर्मळ, आत्मिक दुधाची इच्छा ठेवा, यासाठी की त्याद्वारे तुम्ही तारणाच्या मार्गात वाढत
३,४ जावे. **कारण** तुम्ही येशूंच्या कृपेची चव घेतलेली आहे. **ज्यांना** माणसांनी बेकार जाणले; परंतु देवपित्याच्या
५ दृष्टीत जे निवडलेले व मूल्यवान असे जिवंत खडक आहेत त्यांच्या जवळ या. **कारण** त्यात तुम्ही देखील
स्वतः जिवंत दगडासारखे आत्मिक घर असे रचले जाता हयासाठी की, याजकांचा पवित्र समूह तयार
होऊन अशी आत्मिक भेट आणावी जी येशू ख्रिस्तांच्या नावाने देवबापास ग्रहण योग्य व आवडती
६ अशी असावी. **म्हणून** बायबलमध्ये सुद्धा लिहिले आहे की पहा, मी सियोनात निवडलेली मूल्यवान
अशी कोनशिला रचतो आणि जो कोणी त्यांच्यावर विश्वास करेल त्याला कोणत्याच प्रकारे लाजिरवाणे
७ व्हावे लागणार नाही. **म्हणून** तुम्ही जे विश्वास ठेवता, त्यांच्यासाठी ते मूल्यवान आहे परंतु जे
लोक विश्वास ठेवत नाहीत, त्यांच्यासाठी, ज्या दगडाला राजमिस्त्र्यांनी/बांधणाऱ्यांनी व्यर्थ सिद्ध केले
तेच कोनशिलेचा मुख्य खडक असे झाले आहेत. ठेच लागण्याची दगड आणि अडखळण्याचा खडक
८ असे झाले आहेत. **असे** लोक सत्याला मानत नसल्यामुळे केवळ ठेचाळतच नाहीत तर ठेच

---

**२:३** - स्तोत्र ३४:८.

**२:४,५** - *"जिवंत खडक/धोंडा"* - अर्थातच येशू ख्रिस्त. विश्वासू निर्जीव मुर्तिकडे नाही तर जिवंत व सजीव व्यक्तिकडे येतात.

*"बेकार/व्यर्थ/नाकारलेला"* - मत्तय २१:४२; मार्क ८:३१; लूक ९:१२; लूक १७:२५; योहान १:११; प्रेषित ४:११.

*"बहुमूल्य/मूल्यवान"* - मत्तय ३:१७. देवबापांचे विचार मनुष्यांच्या विचारांपेक्षा वेगळे कसे आहेत त्याकडे लक्ष दया.

*"जिवंत खडक"* - ख्रिस्तांकडे आल्यावर स्वतः ख्रिस्ती विश्वासून जिवंत दगड असे बनतात. जिवंत दगड म्हणजेच *"एक जीवनदायक आत्मा"* (१करिंथ १५:४५) आहे.

*"भवन/घर"* - इफि २:१९-२२; इब्री ३:६; १करिं ३:९ - परमेश्वर शिल्पकार आणि रचनाकार आहेत. म्हणूनच आपण या गोष्टींमुळे निश्चित असावे की, देवपित्यांनी आपल्या घराची उत्तम योजना तयार केली आहे. त्यांना प्रत्येक दगडाची ओळख आहे. व त्या दगडाला कोठे रचावे, कोठे मांडावे हे सुद्धा त्यांना ठाऊक आहे म्हणून काही दगड काढून त्यांच्या ऐवजी दूसरे दगड ठेवण्याची त्यांना गरज नाही. एका हाताने तोडून, दुसऱ्या हाताने रचण्याचे कार्य परमेश्वर करत नाहीत. इफि २:२१ चे नोट्स पहा.

*"याजकांचा पवित्र समूह"* - विश्वासू फक्त *"घराच्या"* स्वरूपात रचले जात नाही पण ते त्या घरात मध्यस्थाच्या रूपात सेवा करतात. वचन ९, प्रकटी १:६; इब्री १०:१९-२२ नव्या करारात विश्वासूंपैकी काही विशेष लोकांना घेऊन पुरोहित/याजक बनवले गेले नाही, परंतु सर्वच विश्वासूंना, जरी ते *"सामान्य विश्वास"* ठेवणारे असतील किंवा मंडळीचे पुढारीपण शोभवणारे असोत; येशूंनी मंडळीतील प्रमुख पुढारी होण्याआधी योजले आहे त्यांत पुरोहिताचे पद दिले गेलेले नाही (इफि ४:११; १करिं १२:२८) याकडे विशेष लक्ष दिले जावे.

*"आत्मिक भेट"* - रोम १२:१; इब्री १३:१५,१६; याजकाजवळ चढविण्यासाठी काहीतरी बलिदान असावे लागते. "याजक" या नात्याने विश्वासू जवळ चढवण्यास योग्य असे बलिदान म्हणजे त्याचे *"स्वतःचेच"* समर्पण होय. त्याचप्रमाणे त्यांची स्तुति, त्यांचे प्रेम व दयेची कार्ये ही सुद्धा चढवण्यास योग्य असे बलिदान आहे.

**२:६** - वचन ४, यश २८:१६; जखऱ्या १:४; इफि २:२०;

**२:७** - *"मूल्यवान"* - १:८. विश्वास आणि भरवसा ठेवण्यासाठी येशू ख्रिस्त बहुमूल्य असे आहेत. केवळ असे लोकच त्यांचे मूल्य समजतात कारण खरे पाहता केवळ हेच लोक त्यांच्यावर प्रीति करतात.

*"कोनशिला"* - स्तोत्र ११८:२२; मत्तय २१:४२; प्रेषित ४:११

**२:८** - यश ८:१४; इफि ९:३३. जे लोक देवबापाच्या सत्यतेचे पालन करत नाहीत, ते त्या सत्याप्रति धोक्यातच असतात कारण ते सत्य स्वतः येशू ख्रिस्तच आहेत. (लूक २:३४). जे त्यांच्यावर प्रेम करतात, ते कधीच अयशस्वी होत नाहीत.

९ लागण्यासाठी निवडले सुद्धा जातात. **परंतु** तुम्ही एक 'निवडलेला वंश, राजकीय याजकगण/पुरोहित,
पवित्र राष्ट्र आणि देवबापांचे स्वतःचे लोक आहात, म्हणूनच ज्यांनी तुम्हाला अंधारातून आपल्या
१० अद्भुत प्रकाशात निमंत्रण दिले त्यांचे चांगले गुण दाखवावेत. **पूर्वी** तुम्ही लोक ''परमेश्वरांचे
लोक'' नव्हता, परंतु आता देवबापांची प्रजा आहात. तुमच्यावर दया केली गेली नव्हती पण आता
तुम्हाला दया मिळाली आहे. **हे** प्रियांनो, मी तुमच्यावर प्रेम करतो. तुम्ही स्वतःला परदेशी व यात्री
११,१२ जाणून त्या सर्व जगिक अभिलाषांना ज्या आत्म्याशी युद्ध करतात, दूर रहा. **दुसऱ्या** लोकांच्या मध्ये

---

***''ठरवले सुद्धा गेलेत''*** - यहूदयांनी ख्रिस्तांना जो नकार दिला, कदाचित पेत्र त्या गोष्टीकडे संकेत करत आहे. प्रभु येशू व प्रेषित पौल स्तोत्र आणि यशयातील उदाहरणाद्वारे शिकवत आहेत या विषयावर रोम ९-११ चे नोट्स पहा. विशेषतः ९:१४-२१, ३०-३३; ११:७-१२, २२-३२.

**२:९** - ***''निवडलेले''*** - इफि १:४-११; योहान १५:१६.

''राजकीय याजक/पुरोहित - वचन ५, या शब्दांद्वारे असा भास होतो की, एक अशा प्रकारचे याजकपण जे एखादया राजाचा असते, व जी प्रजा त्याच्या सेवेत व्यस्त असते. असा याजकांचा समाज जो राज्य निर्माण करतो. (प्रकटी ५:१०) किंवा असे याजकपण, जेथे सर्वच राजकुमार आहेत किंवा तिन्हीही स्वरूपात विदयमान आहेत.

***''पवित्र राष्ट्र''*** - असे राष्ट्र जे पृथ्वीच्या सर्व इतर लोकांपासून वेगळे केले गेले आणि जे केवळ परमेश्वराप्रति समर्पित आहे. तुलना करा निर्ग १९:५,६; योहान १७:६. पेत्र मंडळीला ***''नवीन इस्त्राएल''*** किंवा ***''आत्मिक इस्त्राएल''*** असे म्हणत नाही, तो तर यहूदी विश्वासूंना लिहित आहे, इस्त्राएल राष्ट्राला नव्हे ज्यांनी ख्रिस्तांचा तिरस्कार केला. हेच लोक इस्त्राएलाचे खरे यहूदी ख्रिस्ती आहेत. पेत्र असे म्हणत नाही की, जुन्या इस्त्राएलाची देवबापाला काही देणे-घेणे नाही. (प्रेषित १:६,७ शी तुलना करा). नव्या कराराचा कोणताहि लेखक मंडळीला ***''नवीन इस्त्राएल''*** असे नाव देत नाही, आणि त्यांनी तसे केले नाही म्हणून आपण सुद्धा तसे करू नये. दुसऱ्या धर्मातून आलेले विश्वासू इस्त्राएल वंशशी जुळलेले आहेत. पहा रोम ११; इफि २:११-१९.

***''प्रजा''*** या ठिकाणी ग्रीक शब्दाचे अनेक कार्य आहेत : ***''सुरक्षित ठेवणे'', ''प्राप्त करणे'', ''चांगले गुण''*** या ग्रीक शब्दाचा अर्थ चांगले कार्य, उत्तमता इत्यादि गोष्टी, ज्या प्रशंसनीय आहेत. फिलि ४:८ आणि २पेत्र १:३,५ पहा. यहूदी, ख्रिस्ती किंवा इतर धर्माचे लोक कोणीहि असोत, त्या सर्वांचे विशेष अधिकार हेच आहेत की त्यांनी जगापुढे एका जिवंत परमेश्वराचे चांगले कार्य व गौरव प्रस्तुत करावे. स्वतःच्या नव्हे तर ख्रिस्तांच्या गौरवासाठी कार्यरत रहा. आपल्या चांगुलपणाचे नाही तर येशूंच्या उत्तम कार्यांचे वर्णन करा. (तुलना करा. स्तोत्र ४०:१०; ७१:१६; यश ४२:१२; ४३:७; इफि १:६,१२,१४) ***''अद्भुत प्रकाश''*** - प्रेषित २६:१८; २करिं ४:६; इफि ५:८; कल १:१३; १योहान १:५,७.

**२:१०** - ख्रिस्तावर भरवसा ठेवण्यापूर्वी यहूदी व परराष्ट्रीय लोक यांच्यात विभाजन होते आणि ते परमेश्वराचे आत्मिक लोक नव्हते. होशे १:९,१०; २:२३; रोम ९:२४-२६; इफि २:११,१२. दयेचा आधार घेऊन देवबाप लोकांना अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे कार्य करतात. (तीताला ३:५).

**२:११** - ***''परदेशी व यात्री''*** १:१७. ते लोक जे आपल्या वास्तविक घरापासून, म्हणजे स्वर्गापासून दूर राहत आहेत.

***''जगाची अभिलाषा''*** - १:१४. या सर्व गोष्टी जगिक आणि पापमय स्वभावाच्या आहेत. विश्वासू स्वर्गाचे आहेत.

***''आत्मा''*** मूळ, इब्री भाषेत ***''सायके''*** अर्थात ***''प्राण''*** शब्द आलेला आहे. १थेस्स ५:२३ पहा. ***''युद्ध'' ''वाईट गोष्टींची आवड''.*** हे सैतानाचे एक हत्यार आहे ज्याचा उपयोग तो विश्वासूंच्या विरूद्ध युद्ध करताना करतो. (इफि ६:११,१२) त्याचप्रमाणे वाईट इच्छा एखादया ***'तरवारी'*** प्रमाणे आहे जी आपल्या आत्मिक जीवनाला घायाळ करते. या वाईट इच्छा आपल्या ***''डोक्यातील अशा अग्नीमय बाणासारख्या''*** आहेत ज्या आपल्या मेंदूतील विचारांना ***''परमेश्वर व पवित्रता''*** यापासून दूर नेतात. बंदूकीच्या गोळीप्रमाणे, शरीरास घातक अशा आहेत. त्याचप्रमाणे वाईट इच्छा प्राणघातक असतात आणि परिणाम असा होतो की, त्या दुःखे व पीडा यांना जन्म देतात. महणूनच सावध राहा, आपण आपल्या हृदयात त्यांना स्थानच देऊ नये.

***''दूर रहा, सुरक्षित रहा''*** - परमेश्वरांच्या मदतीने आपण वाईट गोष्टीपासून दूर राहू शकतो. आणि हेच आपले ध्येय असावे.

राहत असतांना तुमचे आचरण चांगले असावे, यासाठी की ज्या गोष्टीत ते तुम्हाला वाईट जाणून
तुमची बदनामी करतात, त्यांनी तुमच्या चांगल्या कार्यामुळे त्या कृपादृष्टीच्या दिवशी देवबापाची स्तुति
१३ करावी. **येशूंसाठी** तुम्ही नागरिकांच्या पालनासाठी केलेल्या कायदयांच्या अधीन रहा; राजाच्या अधीन
१४ यासाठी, की तो सर्वाच्यावर शासन करतो. **अधिकाऱ्यांच्या** अधीन यासाठी, कारण ते
वाईट वागणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी आणि चांगले वागणाऱ्यांना सन्मानित करण्यासाठी देवबापांनी
१५ स्वतः पाठवलेले असे आहेत. **देवबापांची** इच्दा हीच आहे की, तुम्ही चांगली कामे करून अज्ञानी
१६ लोकांची कामे बंद करून टाकावीत. **स्वतःला** स्वतंत्र समजा परंतु आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग,
आपली वाईट कामे झाकण्यासाठी कठ नका, आणि स्वतःला परमेश्वरांचे सेवक असे समजा.
१७ **सर्वांचा** सन्मान करा, भाऊ बहिणींवर प्रेम करा, देवबापांच्या भयात रहा आणि राजा/शासक यांचा

---

जर आपण या वाईट लालसांना हृदयात वास करण्याची परवानगी दिली तर, त्या आमच्यावर प्रबळ होतील, आणि नंतर त्यांचा त्याग करण्याऐवजी आपल्या हृदयातच वास करू देणे आपल्याला जास्त सोपे व सोयीस्कर वाटेल. वाईट कामापासून दूर राहणे म्हणजेच बुद्धीचा मार्ग अवलंबणे आणि या कार्यात नक्कीच परमेश्वर आपली मदत करतात. पण हे देखील सत्यच आहे की, या कार्यात विश्वासूची निवड आणि इच्छा यांची मुख्य भूमिका आहे; म्हणूनच आपण आपल्या डोक्यात त्यांना स्थान न देण्याची योग्य निवड करावी.

**२:१२** - मत्तय ५:१६ पहा.

***"चांगले"*** - ग्रीक शब्दाचा अर्थ आहे ***"सर्वोत्तम"*** आणि प्रशंसनीय, योग्य आकर्षक व चांगला.

***"बदनाम करतात/वाईट नावे ठेवतात"*** - येशूंचा तिरस्कार करणारे लोकच, विश्वासूंच्या नावाची बदनामी करतात. असे लोक विश्वासूच्या चुका व उणीवा शोधतात, परंतु जेव्हा दुसरे लोक आपली निंदा करतात तेव्हाहि आपण चांगली कामे करण्यासाठी उत्साहित असावे. कारण या वाईट गोष्टी चांगुलपणाला जन्म देतील व त्यामुळे चांगली कार्ये साधली जातील.

***"कृपादृष्टीचा दिवस"*** - याचा संकेत त्या विशेष काळाकडे होऊ शकतो, जेव्हा परमेश्वर पिता आपल्याला आशीर्वाद देतील किंवा आपल्याला देवबापांचा न्याय प्राप्त होईल.

**२:१३,१४** - रोम १३:१-५.

**२:१५** - ***"चांगली कार्ये करणे"*** - खिस्तांच्या आनंदाच्या बातमीचा योग्य पक्ष ठेवण्याचा सर्वात चांगला उपाय म्हणजे विश्वासूचे परिवर्तित आणि पवित्र जीवन.

***"अज्ञानता"*** - १:१४; २पेत्र ३:१६. ते सर्व खिस्तांच्या, शुभवर्तमानाच्या आणि देवबापाच्या लोकांविरूद्ध बोलतात, कारण ते सत्य परमेश्वराला ओळखत नाहीत (योहान १५:२१; इफि ४:१७,१८)

***"अक्कल नसलेले लोक"*** - रोम १:२१,२२.

**२:१६** - गल ५:१३; रोम ६:१५-१८

**२:१७** - ***"सर्वांचा"*** - श्रीमंत व गरीब उच्च किंवा नीच, शिक्षित किंवा अशिक्षित अशा सर्व प्रकारच्या गर्वाच्या व श्रेष्ठतेच्या भावनेचा त्याग करावा लागेल. विश्वासूंनी दुसऱ्यांना तुच्छ मानू नये तुलना करा. रोम १२:१०; याकोब २:१-४,९; १करिं १२:१४-२६; प्रेषित ६:१.

***"परमेश्वराचे भय"*** - पहा १:१७ चे नोट्स. स्वर्गिक पित्याशी प्रेम करण्याची आज्ञा ज्याप्रमाणे दिली गेली आहे त्याचप्रमाणे त्यांचे भय ठेवण्याचीहि आज्ञा दिलेली आहे. खरे पाहता, ***"सन्मान पूर्ण भय व आशा"***, जी आपण स्वर्गिक पित्यावर करतो, ती आपल्या प्रेमाशी संबंधितच असते आणि त्यांना वेगळे केले जाऊ शकत नाही. विश्वासूंना ही आज्ञा दिली गेली आहे म्हणून हे सद्गुण आपल्या अंगी असणे महत्वाचे आहे. जर या गोष्टींचा अभाव आपल्यात आढळला तर आपण दाविदासारखी प्रार्थना करावी. स्तोत्र ८६:११

***"राजाचा सन्मान करा"*** - तुलना करा रोम १३:१-७.

१८ आदर व मान ठेवा. **अरे** नोकरांनो, पूर्ण भय व आदराने आपल्या स्वार्मींच्या अधीन रहा. केवळ
१९ चांगल्या व नम्र लोकांच्या नव्हे तर निर्दयी व कठोर लोकांच्याहि अधीन रहा. **जर** परमेश्वरांचे स्मरण
२० ठेवून एखादा व्यक्ति अन्यायामुळे दुःख सहन करतो, तर ही अत्यंत आदराची गोष्ट आहे. **कारण**
दोषी असताना जर तुम्ही मुक्के खाल्ले आणि धैर्य राखले तर त्यात कोणता मोठेपणा आहे? परंतु
जर चांगली कार्ये करून तुम्ही दुःख सहन करता व संयम दाखवता तर यामुळे परमेश्वर बाप प्रसन्नच
२१ होतात. **तुम्ही** अशाच प्रकारच्या जीवनासाठी बोलावले सुद्धा गेला आहात. कारण ख्रिस्तांनी दुःख
२२ सहनाद्वारे, तुमच्या समोर एक नमूना/आदर्श सोडला आहे, त्यांच्यासारखे तुम्ही व्हावे. **येशूंनी** पाप
केले नाही आणि त्यांच्या मुखाद्वारे छळ व कपट यापैकी कोणतीहि गोष्ट निघाली नाही. त्यांनी शिवी
२३ ऐकून शिवी दिली नाही आणि दुःख भोगून कोणालाच धमकी दिली नाही. **त्यांनी** योग्य न्याय
२४ करणाऱ्याच्या (अर्थातच परमेश्वरांच्या) हातात स्वतःला सोपवून दिले. **ते** स्वतः आमची पापे आपल्या
शरीरावर वाहून क्रूसावर चढले, यासाठी की त्याद्वारे आपण पापासाठी मेलेले होऊन चांगल्या
२५ कार्यासाठी जगावे. त्यांच्या जखमांमुळे तुम्ही निरोगी झाला आहात. **आधी** तुम्ही भटकलेल्या
मेंढरासारखे होता, पण आता आपल्या प्राणांच्या मेंढपाळाजवळ (देखरेख करणाऱ्याजवळ) परत आला
आहात.

---

*"सेवकांनो"* - इफि ६:५-८; कल ३:२२-२४.

*"प्रशंसनीय"* - स्वतः परमेश्वर अशा लोकांची प्रशंसा करून त्यांना त्यांचे प्रतिफळ देतील.

**२:२०** - तुलना करा. ४:१५,१६

*"धैर्य/संयम राखा"* - क्रोध करत नाहीत किंवा बदलाहि घेत नाहीत.

**२:२१** - *"बोलवले सुद्धा गेले आहात"* - जेव्हा स्वर्गिक पिता आपल्याला विशेष लोक होण्यासाठी बोलवतात तेव्हा चांगल्या कार्यासाठी दुःख सहन करणे हा पाचारणाचा एक भागच आहे. ख्रिस्त येशूंनी चांगल्या कार्यासाठी दुःख भोगले. ते आपल्यासाठी एक आदर्श उदाहरण आहेत. त्यांनी केवळ चांगली व योग्य कामेच केली तरी सुद्धा आपल्यापेक्षा अधिक पीडा भोगली.

*"त्यांच्यासारखे तुम्ही व्हावे"* - मत्तय ४:१९; ८:२२; १६:२४; १९:२१; लूक ९:२३; योहान १:४३; १०:४,२७; १२:२६; रोम १५:५; १करिं ११:१. *"ख्रिस्तांवर विश्वास आहे"* असे म्हणणारे लोक जर त्यांच्या मागे चालत नाहीत, त्यांना आदर्श मानत नाहीत, तर ते खोटे आहेत व स्वतःला धोक्यात ठेवतात.

**२:२२** - यश ५३:९; मत्तय २७:२३; योहान ८:४६; १९:४; २करिं ५:२१; इब्री ४:१५; ७:२६.

**२:२३** - यशया ५३:७. आपला व्यवहार सुद्धा याच प्रकारचा असावा. *"धर्ममय न्याय करणारे"* केवळ परमेश्वरच आहेत.

**२:२४** - या ठिकाणी बायबलमध्ये स्पष्टपणे सांगितले गेले आहे की, येशूंनी आमच्या ऐवजी दुःख सोसले. पहा ३:१८; यश ५३:५; मत्तय २०:२८; योहान १:२९; १०:११,१४; रोम ३:२५; २करिं ५:१४,२१; इब्री ९:२८ येथे ख्रिस्तांच्या दुःख सहनाचा व मृत्यूचा अभिप्राय पहा. तुलना करा रोम १४:९; २करिं ५:१५.

*"पापांसाठी मेलेले असे होऊन"* - रोम ६:१०-१४; गल २:२०; कल ३:५.

*"चांगल्या कार्यांसाठी जीवन"* - रोम ६:१८,१९; १४:१९,२१; २करिं ५:२१; इफि ४:२४; फिलि १:११; १तीम ६:११.

*"स्वस्थ/निरोगी झालात"* - यश ५३:५. पाप आमचे होते, पण येशूंनी आमचे रोग बरे करण्यासाठी दंड/शिक्षा स्वतः वर लादून घेतली.

**२:२५** - *"भटकलेले"* - यश ५३:६.

*"रक्षक/देखरेख करणारे"* ५:४; योहान १०:१-१८.

**३** हे पत्निनों, याच प्रकारे तुम्ही सुद्धा आपल्या पतिंच्या अधिकारांचा स्वीकार करा, त्यांचाहि जे
२ परमेश्वराला मान्य करण्यासाठी तयार नाहीत. **तुम्ही** शांत असला तरी केवळ तुमच्या वागणुकीनेच ते
३ येशूंना आपलेसे करणारे होऊन जातील. **बाहेरून** दिसणाऱ्या श्रृंगाराविषयी जास्त विचार करू नका,
४ जी वेगवेगळया प्रकारच्या केस गुंफण्याने, महाग दागिने आणि सुंदर वस्त्राद्वारे केली जाते. **शांत** व
नम्र स्वभावाचे आतील सौदर्य अविनाशी आहे जे परमेश्वरांच्या दृष्टीने बहुमूल्य आहे. तीच
५ तुमची ओळख व शोभा असावी. **पूर्वीच्या** काळी परमेश्वरांवर प्रीति करणाऱ्या स्त्रिया याचप्रकारे
स्वतःला आकर्षक बनवून ठेवत असत. त्यांचा भरवसा देवबापावर होता व त्या आपल्या पतिंच्या अधीन
६ राहत असत. **उदाहरणासाठी** सारा, अब्राहामाला "माझे स्वामी", असे म्हणून संबोधित/बोलवत होती.
आणि जे काही तो सांगत असे, ते सर्व करत होती. जर तुम्ही तिच्यासारखे योग्य तेच कराल तर,
७ भयभीत न होता, सर्व गोष्टींचा सामना कराल तर, तिच्या कन्या ठराल. **याचप्रकारे** पतींनो, तुम्ही सुद्धा
आपल्या पत्निंचा सन्मान व आदर करा. त्यांच्याशी समंजसपणाने वागा. ती नाजूक व बलहिन होऊ
शकते तरीहि तुम्ही दोघेही परमेश्वरांच्या नवजीवनाच्या वरदानात बरोबरीने वतनदार/भागीदार
८ आहात. असे केल्याने तुमच्या प्रार्थनेच्या उत्तरात कोणतीहि अडचण येणार नाही. **सारांश** हाच आहे
९ की, तुम्ही सर्वांनी एक मनाने, सहानुभूति व प्रेमाने भरलेले असे दयाळू व नम्र व्हावे. **वाईटाबद्दल**

---

*"अध्यक्ष किंवा बिसप"* हाच शब्द प्रेषित २०:२८ यात मंडळीच्या पुढाऱ्यांसाठी वापरला गेला आहे. फिलि १:१; तीताला १:७. ज्याप्रमाणे ख्रिस्त प्रमुख मेंढपाळ आहेत त्याचप्रमाणे ते प्रमुख रक्षक/सांभाळणारे सुद्धा आहेत.

**अध्याय ३**

**३:१,२** - *"अधिकारांचा स्वीकार"* - इफि ५:२२-२४.

*"मान्य करणारे"* - येशूंसाठी जिंकले जाणे. तुलना करा १करिं ७:१६.

*"वागणूक/वर्तन"* - इतर सर्व उपाय अयशस्वी झाल्यानंतर याच एका पद्धतीने अविश्वासू लोक ख्रिस्ताजवळ ओढले जाऊ शकतात. पत्नीने प्रचार केला तर कदाचित पति येशूंजवळ येण्याऐवजी त्यांच्यापासून दूर जाऊ शकतो.

**३:३,४** - यश ३:१६-२३; १तीम २:९,१०. आपल्या भिन्न-भिन्न प्रकारच्या आकर्षक केश-रचना, दागिने वापरणे, सुंदर, आकर्षित करणारे वस्त्र घालणे, या सर्वांद्वारे नाही तर आतील/अंतःकरणातील सौंदर्याद्वारे स्त्रिया आपल्या पतिंना ख्रिस्ताजवळ आणू शकतात. नीति ३१:१०-३१ शी तुलना करा जर स्त्रियांनी आतील सुंदरतेकडे लक्ष दिले असते तर मंडळीचे व जगाचे चित्र वेगळेच राहिले असते.

**३:५,६** - पवित्रता, परमेश्वरावरील आशा आणि अधीनतेचा आत्मा, ही अशी चिन्हे आहेत की, परमेश्वर पिता एखादया विश्वासू स्त्रिच्या जीवनात ती पाहू इच्छितात.

*"सारा"* - उत्पत्ति १८:१२

*"कन्या"* - अब्राहाम सर्व विश्वासूंचे पिता आहेत. (रोम ४:१६). सारा, अशा विश्वास करणाऱ्या स्त्रियांची आई आहे ज्या आपल्या पतिंच्या अधीन आहेत.

**३:७** - इफि ५:२५,२८; कल ३:१९. येथे पेत्र ख्रिस्ती पतिंना संबोधित आहे.

*"समंजसपणाने"* पतिंनी, पत्नींच्या समस्या, इच्छा अशक्तपणा समजून घ्यावा आणि तसे असले तरी त्यांचा आदर करावा.

*"बलहिन/नाजूक"* शारीरिक रीतिने स्त्रिया नाजूक असतात. असे असले तरी त्यांची विचार-क्षमता आणि भावनात्मक रचना वेगळी आहे. त्यांचे पद सुद्धा नाजूक आहे. त्यांनी पतींची आज्ञा मानून त्यांच्या अधीन असायचे आहे.

*"प्रार्थनेत बाधा/अडचण येऊ नये"* - जर विवाहित पुरूष व स्त्री यांची अशी इच्छा आहे की, त्यांना त्यांच्या प्रार्थनेचे उत्तर मिळावे तर एकमेकांप्रति असलेल्या व्यवहारिक संबंधाप्रति त्यांनी सतर्क असावे. एखादा पति जर आपल्या पत्नीशी वाईट वागत असेल किंवा जर पत्नी पतिच्या अधीन नसेल तर, अशा अवस्थेत दोघांच्याहि प्रार्थनेचे उत्तर देण्यास परमेश्वर नकार देऊ

वाईट आणि अपमानाऐवजी अपमान करू नका, परंतु आशीर्वादच दया कारण तुम्हाला अशासाठीच
१० पाचारण करण्यात आले आहे. (बोलवले गेले आहे). तेव्हाच तुम्हाला आशीर्वाद प्राप्त होईल. **कारण**
जो आपल्या जीवनाचा हितैषी (चांगले होण्याची इच्छा बाळगणारा) आहे आणि आपण चांगले दिवस
पाहावे अशी ज्याची इच्छा आहे, त्याने आपली जीभ वाईटापासून व ओठ लबाडीपासून आवरावे/वाचवावे.
११ **त्याने** दुष्टतेकडे पाठ फिरवून बरी कामें करावी. त्यांनी दुसऱ्यांशी शांतिने मिळून मिसळून रहावे.
१२ **यासाठी** की, येशू ख्रिस्तांचे डोळे, त्यांनी क्षमा केलेल्या लोकांकडे व त्यांचे कान नीतिमानांच्या
प्रार्थनेकडे लागलेले असतात. वाईट करणाऱ्या लोकांपासून येशू आपले मुख विरूद्ध दिशेला फिरवतात.
१३ **जर** तुम्ही योग्य आणि चांगले करण्याचे अंतःकरण बाळगत असाल तर, कोण तुमचे वाईट करू
१४ शकेल? **परंतु** हेच खरे आहे की, जर तुम्ही नीतिमत्वांच्या कार्यामुळे दुःख सहन करत असाल तर,
१५ त्याचे सुद्धा प्रतिफळ तुम्हाला प्राप्त होईल; म्हणून घाबरू नका किंवा चिंता देखील करू नका. **या**
ऐवजी येशूंना आपल्या जीवनाचा स्वामी व प्रभु असे जाणून त्यांचीच आराधना करा. जर कोणी
तुम्हाला, तुमच्या आशेविषयी विचारले तर, त्यांना उत्तर देऊन समजवण्यासाठी नेहमी तयार असा.
१६ **परंतु** तसे करताना, सन्मान, दीनता आणि शुद्ध विवेक आपल्यात असू दया, यासाठी की, जे लोक
तुमच्या ख्रिस्ती वर्तनाविषयी विरोध करतात त्या सर्वांनी तुमच्यावर आरोप लावतांना लज्जित व्हावे.
१७ **कारण** जर देवपित्यांची हीच इच्छा आहे की, तुम्ही चांगले वागल्यामुळे दुःख भोगावे तर ते सुद्धा बरेच

---

शकतात.

**३:८,९** - रोम १२:९-१७; इफि ४:२,३,३२; फिलि २:२,३; कल ३:१२-१४; लूक ६:२८; योहान १३:३४; १थेस्स ५:१५.

*''आशीर्वादाचे वतन होण्यासाठी''* - १:३,५; गल ३:१४; इफि १:३; म्हणजेच आजचे आशीर्वाद त्याचप्रमाणे भविष्यात प्राप्त होणारे आशीर्वाद. हया अनुग्रहाला व कृपेच्या आशीर्वादाला लक्षात घेऊन आपण इतरांशी सूड/बदला घेणे सोडून दयावे. दुसऱ्यांना आशीर्वादच देण्यासाठी नेहमी तत्पर असावे.

**३:१०-१२** - स्तोत्र ३४:१२-१६; वचन ८,९ प्रमाणे जर आपण देवबापांच्या आज्ञेप्रमाणे जीवन घालवले/व्यतित केले नाही तर चांगल्या दिवसांऐवजी वाईट दिवस पाहावे लागतील आणि याचा परिणाम असा होईल की, आमच्या प्रार्थना ऐकणे सोडून देऊन प्रभुजी आपले कान आमच्या विनंतीकडे लावणार नाहीत.

**३:१३** - *''शापाऐवजी आशीर्वाद'', ''दया'' - ''करूणेचे व्यवहार'' ''वाईटाऐवजी चांगला व्यवहार''* या सर्व गोष्टी अविश्वासू सुद्धा ओळखतात, पारखतात आणि त्यांची प्रशंसा देखील करतात.

**३:१४** - या जगात राहताना चांगल्याऐवजी दुःख सहन करण्याची शक्यता नेहमी असणे संभव आहे.

२:१९,२०; ४:१२,१३. जर असे होत असेल तर आपण काय करावे? याचे उत्तर हेच आहे की, आपण येशूंनी सांगितलेल्या सत्याचे नेहमी स्मरण ठेवावे.

*''भिऊ नका/घाबरू नका''* - यश ८:१२ शी तुलना करा. मत्तय १०:२६,२८,३१; योहान १४:२७

**३:१५** - *''पवित्र समजून/जाणून आराधना करा''* - याचा अर्थ असा आहे की, प्रभूजींना इतर दुसऱ्या व्यक्तिपेंक्षा नेहमी वेगळे ठेवा, यासाठी की फक्त त्यांचीच उपासना केली जावी आणि आज्ञा पाळली जावी. पूर्ण जाणिवेने आणि स्वइच्छेने येशूंना निरंतर आपल्या अंतःकरणात *''प्रभूंच्या''* स्वरूपातच कायमचे स्थान दयावे.

*''नेहमी तयार असा''* इफि ५:१५,१६. हे जाणून घ्या की तुम्ही ख्रिस्तांचे विश्वासू का आहात आणि स्वर्गात तुम्हाला आशा असण्याचे काय कारण आहे? त्यातील सत्य दुसऱ्यांना स्पष्ट व प्रभावी पद्धतीने आपण नेहमी सांगत जावे.

**३:१६** - *''विवेक''* - प्रेषित २३:१; २४:१६; २करिं १:१२; १तीम १:५,१९; ३:९.

*''लज्जित''* - २:१५.

१८ आहे, या ऐवजी की वाईट केल्यामुळे तुम्ही दुःख सोसावेत. **कारण** निर्दोष व निष्कलंक येशू ज्यांनी
देह रूपात मरण सहन केले व त्यानंतर पवित्र आत्म्याद्वारे जिवंत केले गेले, त्यांनी परमेश्वरांशी
१९ आपला समेट करण्यासाठी एकदाच दुःख सहन केले. **त्यांचे** जगिक शरीर तर नाश केले गेले, परंतु
अलौकिक देहासोबत ते जिवंत होऊन उठले. तेव्हा त्यांनी जाऊन न्यायिक कैदेत बंद आत्म्यांना
२० आनंदाची बातमी सांगितली; **ज्यांनी** नोहाच्या दिवसात जेव्हा तो जहाज तयार करत होता आणि
परमेश्वर त्यांच्या आज्ञा पालनाची वाट पाहात होते, तेव्हा त्या लोकांनी देवबापांची आज्ञा पालन केली

---

**३:१७** - २:२०; ४:१५,१६ पहा

**३:१८** - २:२४ पहा

***"दुःख भोगले"*** - २:२१, ४:१

***"एकदा"*** - योहान १९:३०; इब्री ९:२५-२८; १०:१०

***"निर्दोष येशू"*** - लूक २३:४७; प्रेषित ३:१४; ७:५२; २२:१४; १योहान २:१.

***"अनीतिमान"*** - आपण सर्वजण स्वभावाने असेच आहोत. (रोम १:२९-३२; ३:९-२०,२३). पाप्यांसाठी येशूंचे दुःख सहन करण्याचा हेतू पहा. तो हेतू होता आम्हाला पित्यापर्यंत पोहचवणे. तुलना करा इफि २:१३,१८; इब्री १०:१९-२२; योहान १४:६.

***"नाश केले"*** मत्तय १६:२१; २७:५०,५८-६०; मार्क १५:४३-४५; योहान १९:३२-३४; १करिं १५:३.

***"जिवंत उठले"*** - मत्तय २८:६; रोम १:४

***"आत्मा"*** - यहोवा पित्यांचा आत्मा (योहान १४:१६,१७; मत्तय ३:१६).

**३:१९-२२** - हा भाग जरा कठीण आहे. असे वाटते की, येशूंचे मरण व स्वर्गारोहण, पूर्वीच्या मधल्या काळात येशूंनी कोठेतरी जाऊन बंदीगृहातील काही आत्म्यांना काहीतरी सांगितले. ***"आत्म्यांना"*** किंवा ***"तुरंगात"*** आणि येशूंचा तेथे जाण्याचा काय अर्थ आहे याविषयी पेत्र सांगत नाही. काही लोकांच्या मते पेत्राचा अर्थ असा आहे की, येशूंचा आत्मा नोहा ठायी होता; त्यावेळी जेव्हा तो आपल्या दिवसात लोकांना संदेश देत असे. पण असा अर्थ लावणे म्हणजे वचन १९ च्या शब्दांकडे दुर्लक्ष करणे होय.

**३:१९** - मृत्यूनंतर येशू कोठे गेले? ***"प्रेषितांचा विश्वास"*** नावाच्या ***"विश्वास-अंगीकार"*** यात या शब्दांचा उल्लेख आहे. ***"ते म्हणजे येशू नरकात उतरले"*** खात्रीने दंड सहन करण्यासाठी येशू नरकात गेले नाही. त्यांची सर्व पीडा/त्रास तर क्रूसावरच संपली होती. (योहान १९:३०). पण तरी सुद्धा असे वाटते की, ते मृतकांच्या क्षेत्रात, ज्याला इब्री भाषेत ***"शिओल"*** असे म्हणतात, त्याठिकाणी गेले. (इफि ४:२; स्तोत्र १६:१०).

***"आनंदाची बातमी दिली"*** पेत्र ग्रीक शब्दाचा उपयोग करत नाही ज्याचा अर्थ ***"आनंदाच्या समाचाराचा प्रचार करणे"*** असा आहे परंतु एक शब्द ज्याचा अर्थ ***"आनंदाच्या बातमीची घोषणा करणे"*** असा आहे.

***"आत्मा"*** - पेत्र मनुष्यांच्या आत्म्याकडे संकेत करत नाही, म्हणून हे तेच लोक होते जे जलप्रलयात मरण पावले, असा विचार करणे आवश्यक नाही. बायबलमध्ये कधी-कधी ***"आत्मा" "अशुद्ध आत्मा/दुष्टात्मा"*** किंवा स्वर्गदूत यांच्याकडेहि संकेत करतात. (मत्तय ८:१६; इब्री १:१४).

***"न्यायिक कैद"*** बायबल असे सांगत नाही की, मनुष्यातून निघालेले आत्मे बंदिगृहात आहेत परंतु काही देवदूत सुद्धा तेथे आहेत. (२पेत्र २:४). म्हणून ***"आत्मा"*** म्हणजे, या ठिकाणी संभाव्य अर्थ ***"पापी देवदूत"*** असा होऊ शकतो.

**३:२०** - ***"आज्ञा पालन न करणारे"*** - जलप्रलयापूर्वी ही गोष्ट, देवदूत व मानवाविषयी सत्य होती. (यहूदा ६,७; २पेत्र २:४; उत्पत्ति ६:२-७).

***"आठ"*** - नोहा, त्याची पत्नी, त्याची तीन मुले व त्यांच्या बायका (उत्पत्ति ६:१०; ७:१).

***"जलप्रलयातून वाचले"*** - पुढच्या वचनातील प्रथम किंवा पहिल्या वाक्याशी तुलना करा. ज्याप्रकारे जलप्रलयातून जाऊन देखील ते सर्व वाचले त्याचप्रकारे पाण्याचा बाप्तिस्मा ***"विश्वासूच्या वाचवले जाण्याकडे"*** इशारा करतो. बायबलमध्ये पाण्यातून जाण्याद्वारे ते वाचले नाहीत, पण जहाजात प्रवेश केल्यामुळे ते वाचू शकले. जलप्रलयाच्या पाण्यातून जाणाऱ्या जहाजाद्वारे ते

२१ नाही आणि केवळ आठ लोकच त्या भयंकर जलप्रलयातून वाचू शकले होते. **हा** बाप्तिस्म्याकडे इशारा
आहे; जो तारण प्राप्त करणे दर्शवितो, त्यानुसार, या शरीराचा मळ स्वच्छ करणे हा अर्थ नव्हे तर
२२ शुद्ध विवेक ठेवून देवबापांचे ऐकणे होय. **येशू** ख्रिस्तांच्या पुनरूत्थानामुळे, जे स्वर्गात पोहचले व जेथे
ते परमेश्वरासोबत सर्व अधिकार प्राप्त करून विराजमान आहेत, त्यांच्या स्वाधीन देवूदत, प्रधानता
आणि सत्ताधीश हे ठेवले आहेत.

---

नाश व मृत्यू यापासून वाचले.

**३:२१** - ***"बाप्तिस्मा"*** - मत्तय ३:६; १३-१६; २८:१९; मार्क १६:१६; प्रेषित २:३८. जलप्रलयाचे ***"पाणी"*** पाण्याच्या बाप्तिस्म्याकडे संकेत करते. ग्रीक शब्दाचा अर्थ ***"एकदम अनुरूप"*** ज्याच्या उपयोग येथे केला गेला आहे. इब्री ९:२४ यात अनेक वचनात दिले गेले आहे. ज्याप्रकारे पवित्र तंबूतील, ***"पवित्रस्थान"*** हे स्वर्गातील पवित्र स्थानाचे चित्र होते त्याचप्रकारे जलप्रलयाचे जल/पाणी हे बाप्तिस्म्याचे खरेखरे प्रतिनिधित्व करते.

हे स्पष्ट आहे की, नोहा व त्याचे कुटुंब पाण्यात राहिल्यामुळे वाचले नव्हते, पण जलयान किंवा तारूत राहिल्यामुळे त्यांचे प्राण वाचले.

***"जहाज"*** येशूंकडे संकेत करते. उत्पत्ति ७:२४ पाण्याने त्यांना वाचवले नाही, परंतु पाण्याद्वारे ते वाचवले गेले. इब्री ११:७ स्पष्ट रीतिने दर्शवत की, ते विश्वासद्वारे वाचवले गेले. कोणी कसा विचार करू शकतो की, बाप्तिस्म्यांची विधिच कोणालाहि वाचवू शकते? आणि जर आपण असा विचार केला की, जलप्रलयाच्या जलानेच. नोहाला व त्याच्या कुटुंबाला वाचवले, त्याचवेळी आपण मान्य करावे की, तारणानंतरच बाप्तिस्मा कोणालाहि वाचवू शकतो.

तारण व नवजीवन यासाठी आपण प्रथम ख्रिस्तांकडे येतो. उद्धारानंतरच आपण बापतिस्म्यासाठी पाण्यात उतरतो. तुलना करा मार्क १६:१६. जर आम्ही ख्रिस्तात नाही, म्हणजेच जर आपण तारण प्राप्त केले नसेल तर आपण बाप्तिस्मा घेऊ नये. बाप्तिस्मा येशूंचा मृत्यू, पुनरूत्थान व आपण त्यांच्याबरोबर एक आहोत असे चित्र दर्शवतो. बायबल स्पष्टपणे सांगते की, आम्हाला काय वाचवते? आपण कसे व का तारण प्राप्त करतो?

१) परमपिता परमेश्वर आपल्या कृपेने आम्हाला वाचवतात तीताला ३:४,५.
२) येशू आपल्याला वाचवतात - मत्तय १:२१; रोम ५:९,१०
३) येशूंचे पवित्र रक्त आम्हाला वाचवते - इफि १:७
४) येशूंचे बलिदान आपल्याला वाचवते - इब्री १०:१०-१४
५) विश्वास व कृपा याद्वारे आपण वाचतो - इफि २:८,९; प्रेषित १६:३१; रोम ३:२२-२५; योहान ५:२४; इब्री १०:३९.
६) आनंदाच्या समाचारावर विश्वास ठेवण्याद्वारे आपण वाचवले जातो. - १करिं १५:१-४; प्रेषित १०:४४-४७.

पेत्र म्हणतो की, ही देवबापाची महान करूणाच आहे ज्याद्वारे आपल्याला नवा जन्म यासाठी मिळाला की, आपण जिवंत आशा प्राप्त करावी. १:३. आणि हे सुद्धा की, आपल्या विश्वासाचे लक्ष्य आपला उद्धारच आहे. १:९

***"शरीराचा मळ स्वच्छ करणे"*** पेत्र म्हणतो, बाप्तिस्मा या कार्यासाठी मुळीच नाही. ग्रीक शब्दाचे अनेक अर्थ आहेत. मानवीय देह आणि मनुष्याच्या आतील पापी स्वभाव देखील. बाप्तिस्म्याचा संबंध या दोन्हींशीहि नाही; परंतु याचा संबंध आंतरिक व्यक्तिशी आहे - ***"शुद्ध विवेकाद्वारे"*** परमेश्वराच्या नियंत्रणात/वशात येणे. तुलना करा. इब्री ९:१४; ज्याठिकाणी असे लिहिले आहे की, येशूंचे रक्त आपला विवेक शुद्ध करते. बाप्तिस्मा एक सार्वजनिक घोषणा आहे की, परमेश्वरांच्या इच्छेप्रमाणे विश्वासू जीवन व्यतित करतील आणि आपला विवेक अपवित्र करणार नाहीत, किंवा शांतहि करणार नाही. ज्याप्रमाणे सुंता यहूदयांना तारण देऊ शकत नव्हती, अगदी त्याचप्रमाणे बाप्तिस्म्यामुळे कोणालाहि पाप क्षमा प्राप्त होऊ शकत नाही. पहा रोम २:२८,२९. ख्रिस्तांप्रति भरवसा देणारी अधीनता याठिकाणी आवश्यक आहे, जी बापतिस्म्याद्वारेच दर्शवली जाते. रोम ४:२५ शी तुलना करा. आपण येशूंच्या पुनरूत्थानाद्वारे वाचवले गेले आहोत.

४ म्हणून जेव्हा ख्रिस्तांनी शरीरात दुःख सहन केले तर तुम्ही सुद्धा याच पद्धतीला (मन) हत्यारासारखे
२ ग्रहण करा. यासाठी की ज्यांनी शरीरात दुःख भोगले तो पापापासून सोडवला (स्वतंत्र) गेला. **यासाठी**
या शरीराला बाकी उरलेल्या जीवनामध्ये मनुष्यांच्या अभिलाषेत नाही तर ईश्वरीय इच्छेप्रमाणे घालवा.
३ **कारण** जगातील लोकांची कामे - जसे कामुकता, विषयवासना, मदयपान, रंगेलपणा, मदयपान मैफिली
४ आणि घृणित मूर्तिपूजा हे सर्व करण्यात तुम्ही जो काळ (वेळ) गमावला तितका पुरे. **या** सर्व गोष्टीत
त्यांना आश्चर्य वाटते की, तुम्ही अशा प्रकारच्या निरर्थक वाईट गोष्टीत त्यांचा साथ देत नाही
५ (सामिल होत नाही) म्हणून ते तुमची निंदा करतात. **परंतु** येशू जे जिवंत आहेत आणि ‘मेलेल्यांचा
६ न्याय करतील, त्याच येशूपुढे त्या लोकांना आपल्या कर्मांचा हिशेब दयावा लागेल. **कारण** लोकांना
आनंदाची बातमी देण्याचे तात्पर्य हेच होते की, शारीरिक रीतिने त्यांचा न्याय मनुष्यांनुसार व्हावा,
७ परंतु आत्म्यात त्यांनी ईश्वरीय इच्छेप्रमाणे जगावे. **सर्व** काही लवकर व अचानक संपणार आहे म्हणून

---

**३:२२** - प्रेषित २:३३; इफि १:२०,२१; फिलि २:९-११; इब्री १:३

**अध्याय ४**

**४:१,२** - येशूंनी आम्हाला अपराधातून सोडवण्यासाठी दुःख सोसले. (२:२४; ३:१८). पापांशी झुंज देण्यासाठी कष्ट झेलण्यास आपण सुद्धा तयार असावे. जर हीच शैली (मनाची) आपण टिकवून ठेवली तर, हे आपल्या संघर्षातील एक उपयोगी हत्यार असे सिद्ध होईल. येशू अपराधांसाठी मेले. विश्वासूंनी येशूंशी एकता बनवून ती टिकवून ठेवावी; यासाठी की ते देखील येशूंच्या ठायी दोषांसाठी मरून गेले आहेत. (रोम ६:५-१३; कल ३:३ पहा.) ख्रिस्त येशूंच्या दुःखाच्या प्रकाशात आपण पापापासून स्वतःला दूर केले पाहिजे. आपण आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी नव्हे तर पित्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी जगावे. (रोम ८:५,१२; १२:१२; ४:३ कल १:९; ४:१२; १थेस्स ४:३; इब्री १३:२१) ४:३ तीताला ३:३; १तीम १:१३; इफि २:१-३; १करिं ६:११ शी तुलना करा. येशूंचा समाचार पापांच्या खोलीपर्यंत जाऊन लोकांना नेहमीसाठी बदलून टाकतो. हे जाणून घ्या की, मूर्तिपूजक धर्म आणि येथे वर्णन केलेली जीवनशैली सोबत-सोबत असू शकते.

***“घृणित मूर्तिपूजा”*** - अनु ७:२५; १२:३१; १३:१२-१४; १७:२-५; २७:१५; २९:१७; ३२:१६. अशा विश्वासूंचे पवित्र जीवन ज्यांनी आपल्या जुन्या जीवनाचा त्याग केला आहे. जुन्या जीवनाला कायम ठेवणाऱ्या लोकांसाठी ही एक क्रोधपूर्ण/आवेशपूर्ण सूचनाच होय. अधर्माचे जीवन जगणाऱ्या लोकांसाठी आंशिक रीतिने का होईना, हे एक बदनामीचे कारण आहे. पहा मत्तय १२:३६; प्रेषित १०:४२; १७:३१; रोम २:१६; १४:१२; २तीम ४:१; इब्री ४:१३.

***“हिशेब”*** - रोम १४:१२.

**४:६** - हे एक कठीण वचन आहे. काही लोकांसाठी याचा अर्थ, “ते मृतक लोक ज्यांना त्यावेळी आनंदाची बातमी सांगितली गेली होती जेव्हा ते या पृथ्वीवर होते.” त्यांच्या आणि आमच्यासाठी म्हणजे जे जिवंत आहेत, हेतु एकच होता. तो म्हणजे आत्मिक जीवन प्राप्त होऊन त्यांनी ***“परमेश्वरांच्या इच्छेसाठी”*** जिवंत रहावे. वचन २

काही लोक या वचनाचा अर्थ असा लावतात की, ज्या लोकांना या पृथ्वीवर आनंदाचा समाचार ऐकण्याची संधी मिळाली नव्हती, त्यांना मृत्यू नंतर ती देण्यात आली. या वचनाचा संबंध ३:१९ यांशी लावतात आणि असे समजतात की येथे, ***“आत्मे”*** म्हणजे त्या लोकांचे आत्मे जे मरण पावले आहेत. परंतु बायबलच्या इतर कोणत्याहि पुस्तकात अशी शिकवण दिलेली नाही, म्हणून मनुष्यांच्या विचारावर आधारित शिकवणूकीला आपण जास्त महत्व देऊ नये, कारण ती इकडून तिकडून घेतलेल्या काही वचनांवर किंवा अंशावर आधारलेली आहे. जर अशी एखादी शिकवण सत्य सुद्धा असेल तरी ती ठाऊक नाही. आम्ही, जे प्रगट केले गेले आहे, त्याविषयीच जाणतो. पहा अनु २९:२९ इतर दुसरे लोक असे शिकवतात की, मेलेले म्हणजे ***“पाप आणि अपराधांत मेलेले लोक”*** (इफि २:१) पण या ठिकाणी हा अर्थ खरा किंवा समर्पक वाटत नाही.

**४:७** - ***“अचानक”*** रोम १३:५:९; रोम १३:१२; ५:९; प्रकटी १:३; याकोब ५:८; २पेत्र ३:८,९; मत्तय २४:३६,४२. या युगाच्या शेवटी, मोठया समस्या, परीक्षा आणि भयंकर धोका (मत्तय २४:४-१४; २१-२५) होईल. ख्रिस्ती लोकांसाठी सत्यतेत

८ समंजसपणाने प्रार्थना करण्यात सावध रहा. **प्रीति** अनेक अपराधांना झाकून टाकते, म्हणूनच
९ एकमेकावर प्रेम करणे हीच सर्वात मोठी गोष्ट ठरेल. **एकमेकांचे** पाहुणचार कुरकुर न करता करत
१० रहा. **ज्याला** जे वरदान मिळाले आहे ते देवबापांच्या, वेगवेगळया कृपेच्या, चांगल्या कारभाऱ्यांप्रमाणे,
११ एकमेकाच्या सेवेसाठी वापरा. **ज्याला** शिकवण्याचे कार्य मिळाले आहे, त्यांनी याप्रकारे बोलावे जणू
काही ईश्वरच त्यांच्या माध्यमातून बोलत आहेत. जर तुम्हाला दुसऱ्यांनी मदत करण्याची योग्यता
मिळाली असेल तर परमेश्वरांच्या संपूर्ण शक्तिने व सामर्थ्याने तसे करत रहा. तेव्हा येशू ख्रिस्तांच्या
द्वारे देवबापांना प्रत्येक गोष्टीत प्रशंसा व आदर प्राप्त होईल. सर्व महिमा आणि अधिकार त्यांचाच
१२ आहे. **प्रियांनो,** दुःख रूपी अग्नी परीक्षेतून जेव्हा तुम्हाला जावे लागत आहे तेव्हा असे समजून

---

स्थिर राहण्यासाठी प्रार्थनेची अत्याधिक गरज आहे. येथे खऱ्या प्रार्थनेसाठी दोन गुण आवश्यक आहेत. तुलना करा लूक २१:३६; २२:४०,४६.

***"समंजसपणे"*** - ग्रीक भाषेनुसार, एक असे मन/अंतःकरण जे निरोगी आहे, व्यर्थ आणि भ्रष्ट विचारांपासून वेगळे आहे; एक असे हृदय जे सर्व प्रकारे स्वस्थ निरोगी आहे. अशा प्रकारच्या मनाकडे संकेत केलेला आहे.

***"प्रीति/प्रेम"*** - १:२२; योहान १३:३४; १५:१२,१७; १योहान ३:११,१८; ४:८; पेत्र ग्रीक शब्दाचा "ईश्वरीय प्रेमासाठी" याप्रकारे उपयोग करतो. १करिं १३:१.

***"झाकून टाकते"*** - याचा अर्थ काय आहे आणि काय नाही हे समजून घेण्याची गरज आहे. पेत्र मंडळीच्या अनुशासनासंबंधी किंवा ज्या पापांचा खुलासा करून त्यांना दूर करण्याची आवश्यकता सांगतो, त्याविषयी पेत्र याठिकाणी सांगत नाही. तुलना करा मत्तय १८:१५-१७; प्रेषित ५:१-११; १करिं ५:१-५,१२,१३. पेत्र दर्शवितो की, आपल्या आपसातील संबंधात प्रेमाची भूमिका कोणती आहे. नीति १०:१२ पहा. प्रेम इतरांच्या पापांना प्रगट करत नाही. प्रीति कोणाला लाजण्याचा अनुभव देत नाही, किंवा दोष सुद्धा लावत नाही. आपल्या भरसक प्रयत्नांच्या मदतीने प्रीति परमेश्वरांकडे लक्ष लावते, व त्याद्वारे ती पापांना झाकून टाकते. (तुलना करा स्तोत्र ३२:१,२; रोम ४:६-८; याकोब ५:२०).

प्रेम क्षमा करते आणि करत राहील, याविषयी पेत्र विश्वासूंना प्रीतिचे स्मरण करून देत असावा. (१करिं १३:५; मत्तय १८:२१,२२). त्याच्या म्हणण्याचा हेतु असा सुध्दा असू शकतो की, ज्या मनुष्याजवळ/विश्वासूंजवळ प्रीति आहे, त्याच्या असंख्य अपराधांना परमेश्वर क्षमा करतात (तुलना करा लूक ७:४७-५०) अशा प्रकारचे प्रेम जेथे कोठे दिसते, त्या प्रकारची त्याची लक्षणेहि दिसायला लागतात. सर्व पापांना झाकणारी अलौकिक व अद्‌भुत प्रीति असा मार्ग शोधते जो देवबापांचा न्याय व पवित्रता यास अनुकूल असते. उत्पत्ति ३:२१; ९:२१-२३; प्रकटी ३:१८,१९. जर लोकांसाठी हे लाभाचे नसेल किंवा त्यांना त्याद्वारे पापांत पडून राहण्याचे प्रोत्साहन मिळत असेल तर हे अगदी सत्य आहे की, त्या अवस्थेत नक्कीच प्रेम, इतरांच्या पापांना झाकणार नाही. जर अशी संभावना आहे की, पापी पापाचा त्याग करेल तर तशा स्थितीत प्रीति त्यांना त्या स्थानापर्यंत आणण्याचा म्हणजेच निर्णय घेण्याचा सदैव प्रयत्न करेल. आणि त्या स्थानापर्यंत आल्यावर ते (पापी) आपली वाईट कामे त्यागून देतील. (तुलना करा नीति २८:१३). खरी प्रीति, वास्तविक प्रेम, पापाला कोणत्याहि प्रकारे प्रोत्साहन देणार नाही.

४:९ - रोम १२:१३; १६:२३; इब्री ३:२; ३योहान ८.

**४:१०** - ***"चांगले"*** - रोम १२:६-८; १करिं १२:४-११; इफि ४:७-१३

***"एकमेकांच्या सेवेसाठी"*** - प्रेम करणारे लोक आपल्या योग्यतेचा, क्षमतेचा वापर मदत करण्यासाठी वापरतात. स्वतः वैयक्तिक विकास, प्रगती, संपत्ती आणि प्रसिद्धी यासाठी प्रेम करणारे लोक कधीच आपल्या योग्यतेचा उपयोग करत नाहीत.

***"चांगले कारभारी"*** मत्तय २४:४५-४७; १करिं ४:१,२

**४:११** - ***"बोलावे"*** येथे पेत्र बायबलचा आधार घेऊन, त्या प्रकारच्या सेवेकडे संकेत करतो, जी बोलून केली जाते. जे लोक बोलण्याची सेवा करून येशूंचे वचन सांगतात त्यांनी ***"येशूंच्या जागेवर"*** त्यांचे प्रतिनिधि व राजदूत या रूपाने, पूर्ण अधिकाराने व सामर्थ्याने वचन बोलण्याविषयी जागृत व सचेत राहिले पाहिजे.

***"परमेश्वराची महिमा प्रगट व्हावी"*** - सर्व प्रकारच्या सेवेचा हेतू हाच असावा. जे लोक आपल्या गौरवासाठी बोलतात, सेवा

१३ आश्चर्यचकित होऊ नका की, तुमच्या जीवनात काही विचित्र गोष्टी घडत आहेत. **या** ऐवजी तुम्ही
उल्लास व आनंद करा, कारण या कठीण परिस्थितितून जातांना देखील तुम्ही ख्रिस्तांच्या दुःखाचे भागीदार
होत जाता. नंतर पूर्ण जगासमोर त्यांची अलौकिक महिमा प्रगट झाल्यावर तुम्हाला खुप आनंद होईल.
१४ **जर** येशू ख्रिस्तांच्या नावांमुळे तुमचा अपमान होत असेल तर आनंदित व्हा कारण गौरवाचा आत्मा,
१५ जो देवपित्यांचा आत्मा आहे तो तुमच्यात वास करतो. **कोणत्याहि** प्रकारे तुमच्यात कोणी खूनी, चोर,
दुष्टता करणारा आणि इतरांच्या कामात ढवळाढवळ करणारे असे होऊन त्या कारणाने दुःख
१६ सहन करू नये. **परंतु** एखादा व्यक्ति ख्रिस्ती या नात्याने दुःख सोसत असेल तर, त्याने लज्जित होऊ
१७ नये, या ऐवजी त्या नांवामुळे परमेश्वरांचे गौरव करावे. **परमेश्वरांच्या** कुटुंबापासून न्याय आरंभ
व्हावा ही वेळ आली आहे; म्हणून जर न्यायाची सुरवातच विश्वासूपासून होईल तर त्या लोकांचे काय
१८ होईल ज्यांनी देवपित्याच्या आनंदाच्या बातमीचा स्वीकार केला नाही? **जर** नीतिमान लोकांसाठीच

---

करतात, ते देवबापाला महिमा, आदर, सन्मान न देता, स्वतःचेच गौरव करतात. तुलना करा. मत्तय ६:२,५; १करिं १०:३१.

**४:१२** – ***"आश्चर्यचकित"*** – ख्रिस्तांनी व त्यांच्या प्रेषितांनी पूर्वीच ताकीद दिली होती की, समस्या आणि छळ होईल (२:२०,२१; ४:१; योहान १६:२३; प्रेषित १४:२२; रोम ८:१७; २तीम ३:१२)

***"अग्नी"*** – पेत्र अग्नीद्वारे पारखले जाण्याविषयी सांगतो. ही ती प्रक्रिया आहे जिच्यामुळे कोणताहि धातू शुद्ध केला जातो. पहा १:७; स्तोत्र ६६:१०. प्रभुजी अग्नीसारख्या समस्यांची परवानगी देतात, जेणेकरून त्यांच्याद्वारे त्यांच्या लोकांची पारख व्हावी.

**४:१३** – ***"आनंदी"*** – मत्तय ५:११,१२; प्रेषित ५:४१; रोम ५:३; कल १:२४; याकोब १:२ पारख होता असतांना हा देवबापांचा निर्देश आहे. या परीक्षा होत असतांना आपला व्यवहार महत्वाचा आहे. कुरकुर करणे किंवा निराश होणे, या उलट आपण भरवसा ठेवावा आणि आनंदित व्हावे की, देवपिता आपल्या कल्याणासाठीच सर्वकाही करतील. अग्नीमय समस्या (छळ) सहन करणे म्हणजे ख्रिस्तांच्या दुःखात भाग घेणे. (२करिं १:५).

***"महिमा प्रगट होत असतांना"*** – तीताला २:१३; आपण पारखले जाण्यामुळे व दुःख सहनामुळे आपल्याला त्यावेळी पुरस्कृत केले जाईल (रोम ८:१७,१८; २करिं ४:१६,१८).

**४:१४** – ***"धन्य/आनंदी"*** – लूक ६:२२ पहा, हे त्या अपमानाविषयी सत्य आहे जे ख्रिस्तांचे विश्वासू असल्यामुळे आपल्याला झेलावे लागतात. दुसरे कष्ट जे वेगळया कारणांनी आपल्या जीवनात येतात त्यांच्यासाठी मात्र हे सत्य नाही.

***"गौरवाचा आत्मा"*** – देवबापांचा आत्मा, गौरवमय स्वर्गातून येतो आणि विश्वासूंना त्याच ठिकाणी घेऊन जातो. आता तो त्यांच्यावर असून (प्रेषित १:८; १योहान २:२०) धैर्याने ख्रिस्तांसाठी कष्ट व अपमान सहन करण्याचे चिन्ह आहे.

**४:१५,१६** – ***"लज्जित होऊ नका"*** – प्रेषित ५:४१; इब्री ११:२६ शी तुलना करा. येशूंच्या नांवासाठी ख्रिस्ती लोकांना दुःख का सहन करायचे आहे? आपण अशाच प्रकारच्या जगात राहतो. (योहान १५:१८-२५; १६:१-४). हे जग मुद्दाम अंधकारात आहे कारण ते आत्मिक प्रकाशाचा द्वेष करते. (योहान ३:१९,२०).

**४:१७** – ***"न्याय"*** – १करिंथ ११:३१,३२; २थेस्स १:५. परमेश्वर विश्वासूंचा न्याय करतात, त्यांना अनुशासित करतात, यासाठी की त्यांना जगाबरोबर दोषी ठरवले जाऊ नये. "कुटुंब"- गल ६:१०; इफि २:१६.

***"ज्यांनी स्वीकार केला नाही"*** – योहान ३:३६; २थेस्स १:८,९; प्रेषित २२:१० चे नोट्स पहावे.

**४:१८** – निति ११:३१

***"नीतिमान लोकांसाठी कठीण"*** – मार्क १०:२४. नीतिमान व्यक्तिला तारण प्राप्त करणे, कठीण का होईल? खाली पहा : त्यांचे शत्रु भरपूर असून ते बलवान देखील आहेत. विश्वासू शक्तिहीन/दुर्बळ असून जुना पापी स्वभाव त्यांच्यात आहे. रोम ६:१९; ७:१८; ८:२६; गल ५:१६,१७; १योहान १:८. ***"पेरणे व कापणे"*** या सिद्धांताने ख्रिस्ती नीतिमान लोक वाचू शकत नाही.

परमेश्वरांची इच्छा हीच आहे की ख्रिस्ती माणसाचा व्यवहार व्यवस्थित असावा कारण देवबापांचा स्तर फारच उंच

१९ कठीण होईल तर दुष्ट (वाईट) लोकांचे काय? **म्हणून** ते सुद्धा जे देवबापांच्या इच्छेप्रमाणे दुःख सहन
करतात, त्यांनी योग्य कामे करून, स्वतःला विश्वासयोग्य परमेश्वराला सोपवून दयावे.
**५** तुमच्या सारखाच, वडील पुढाऱ्यांप्रमाणे मी ख्रिस्तांच्या दुःखाचा साक्षी आहे, आणि प्रगट होणाऱ्या
२ गौरवाचा सुद्धा भागीदार आहे. **तुमच्यातील** पुढाऱ्यांना मी सांत्वना देऊन सांगतो की, त्यांनी तेथील
परमेश्वरांच्या लोकांचे रक्षण करावे. यासाठी नव्हे की करावे लागते म्हणून किंवा काही धन लाभ
३ होईल म्हणून, परंतु देवबापांच्या मार्गदर्शनात, आनंदाने कळपाचे संरक्षण करा. **जे** लोक तुमच्याकडे
(रक्षणासाठी) सोपवले गेले आहेत, त्यांच्यावर जोर जबरदस्ती करू नका, परंतु सर्वांसाठी आदर्श असे
४ व्हा. **जेव्हा** मुख्य मेंढपाळ (रक्षणकर्ता) प्रगट होईल. तेव्हा तुम्हाला अशा प्रकारचा गौरवी मुगूट प्राप्त

---

आहे. याच कारणाने त्यांनी आपल्या लोकांसाठी काही सिद्धांत दिलेले आहेत. म्हणूनच त्या सिद्धांताचे पालन करणे अनिवार्य आहे. विश्वासू केवळ लहान द्वारानेच प्रवेश करत नाहीत तर त्यासोबतच त्यांना लहान मार्गावर सुद्धा चालायचेच आहे.

त्यांनी स्वतःच्या इच्छेचा त्याग करून देवबापांची इच्छा पूर्ण करावी (मत्तय ७:२१) आणि सर्वकाही सोडून ख्रिस्तांच्याच गोष्टींचा स्वीकार करावा. (लूक १४:३३)

त्यांनी पवित्रतेचा स्वीकार करावा (योहान १०:२७; इब्री १२:६) कठीण पारख व अनुशासन यातून जात असतांना त्यांनी सुरक्षित बाहेर निघावे. (इब्री १२:५-१३) आणि शेवटपर्यंत विश्वासात टिकून राहिले पाहिजे. (इब्री १०:३८,३९).

जरी नीतिमानाचे तारण व त्यानंतरचे जीवन कठीण असले तरी ते "निश्चित" आहे. (१:५; योहान ६:२९; १०:२८; रोम ५:९,१०).

***"दुष्ट वाईट"*** - नीतिमान लोकांचा उद्धार फारच कठीण आहे. (प्राप्त करण्यात नव्हे तर त्यानंतर येणाऱ्या समस्या व छळामुळे). येशू व त्यांच्या लहान मार्गाचा, पवित्र इच्छेचा आणि विश्वासाचा तिरस्कार करणाऱ्या लोकांसाठी कोणतीच आशा नाही.

४:१९ - ***"सोपवून दयावे"*** - ५:७; स्तोत्र ३१:५; ३७:५; प्रेषित २०:३२.

***"खरी कामे"*** - २:१२,१५; ३:११; रोम २:७; २करिं ५:१०; ९:८; गल ६:९,१०; इफि २:१०; कल १:१०; २तीम ३:१७; तीताला २:१४. पारखले जाणे, बदनामी किंवा अपमान होणे, छळ, पीडा भोगावी लागणे या सर्व गोष्टींद्वारे जरी देवबापांनी आपल्याला अनुशासित केले तरी या सर्व कारणामुळे आपण इतरांसाठी चांगली कार्ये करणे थांबवू नये.

## अध्याय ५

५:१ - ***"वडील पुढारी"*** - प्रेषित १४:२३; १५:२; २०:१७; १तीम ४:१४; ५:१७; तीताला १:५.

***"साक्षीदार"*** पहिल्या प्रेषितांपैकी पेत्र हा एक प्रेषित होता.

***"प्रगट होणारे गौरव"*** - रोम ८:१७,१८.

५:२-४ - येथे आपण पाहतो की, "प्राचीन" (वडील-पुढारी) ग्रीक "प्रेस बिट् रौस" या लोकांना रक्षणाचे व देखरेख करण्याचे कार्य करावयाचे आहे. (२तीम ३:१; ग्रीक भाषेत एपिस्कोपौस) येथे स्पष्ट दिसते की, पेत्र या दोन्ही शब्दांना बरोबरीने पाहत आहे. प्राचीन किंवा रक्षक यांच्यातील आवश्यक असणाऱ्या योग्यतेकडे लक्ष दया. (१ तीम ३:१-७; तीताला १:५-९ यात पहा). खिस्त मुख्य किंवा प्रधान मेंढपाळ आहेत आणि त्यांनी मंडळीच्या देखरेखीसाठी, संगोपनासाठी पुढाऱ्यांना नियुक्त केले आहे. प्रेषित २०:२८. येशूंनी आपल्या लोकांचे रक्षण, संगोपन देखरेख करण्याची महत्वाची जवाबदारी ज्या पुढाऱ्यांना सोपवली आहे त्यांना आपापल्या कार्याचा हिशेब येशूंना दयावा लागणार आहे. येशूंच्या स्वर्गिक इच्छेनुसार, ज्या प्रकारचे रक्षक ते त्यांना बनवू इच्छितात, तशा प्रकारचे रक्षणकर्ता बनण्याची जवाबदारी त्या पुढाऱ्यांची आहे. तुलना करा २:२१; यश ५६:१०-११; यिर्म ३:१५; १०:२१; १२:१०; २३:१-४; यहे ३४:२-१०."धन-लाभ" - मत्तय ६:२४; १तीम ६:८-१०; तीताला १:७

***"आनंदाने"*** - तीताला २:१४.

***"प्रगट होईल"*** - मत्तय २४:३०; तीताला २:१३; इब्री ९:२८; प्रकटी २२:१२.

५:४ - ***"मुगूट"*** - फिलि ४:१; १थेस्स २:१९; २तीम २:५; ४:८; याकोब १:१२. विश्वासयोग्य प्राचीन पुढारी या लोकांसाठी

५ होईल जो कधीच कोमेजणार नाही. **याच** प्रकारे, तरूणांनो, तुम्ही सुद्धा आपल्या पुढाऱ्यांच्या/वडीलांच्या
अधीन राहून त्यांचे ऐका. तुम्ही सर्व एकमेकांप्रति दीनतेने व नम्रतेने व्यवहार करा. केवळ यासाठी
की, ''परमेश्वर अभिमानी व गर्विष्ठ लोकांचा सामना/विरोध करतात. परंतु नम्र लोकांच्या पक्षात/बाजूने
६ कार्य करतात.'' **यासाठी** शक्तिमान परमेश्वरांच्या अधीनतेत, नम्रतेने जीवन जगणे शिका, त्यामुळे
७ योग्य वेळी देवबाप तुमची उन्नति करतील, तुम्हाला वाढवतील. **आपली** सर्व चिंता त्यांच्यावर टाका,
८ कारण ते तुमची काळजी करतात. **आपल्या** स्वतःला नियंत्रणात ठेवा आणि जागे रहा कारण तुमचा
९ शत्रू गर्जणाऱ्या सिंहासारखा या शोधात असतो की कोणावर झेप घ्यावी व गिळावे. **आपल्या** विश्वासात

---

अद्‌भुत पुरस्कारांचा विशेष प्रबंध आहे.

***''कोमेजणार नाही''*** - १करिं ९:२५.

५:५ - ***''त्यांचे ऐकावे''*** - २:१३,१८; ३:१; १करिं १६:१६; इफि ५:२१; याकोब ३:१७; ४:७;

***''दीनता''*** - नीति ११:२; १५:३३; सप २:३; फिलि २:३; कल ३:१२; तीताला ३:२; याकोब ३:१३; मत्तय ५:१३; ११:२९.

***''स्वःतला काहीच न समजणे''*** - त्याचसोबत या गोष्टीसाठी तयार असणे की इतरांनी त्यांना काहीही समजू नये या दोन्ही गोष्टी म्हणजेच ***''दीनतेची चिन्हे''*** आहेत. त्यात देखील, जी पहिली बाब आहे ती दुसऱ्या बाबीपेक्षा जास्त सोपी व सहज अशी आहे.

***''अभिमानी-गर्विष्ठ''*** - याकोब ४:६. स्वर्गिक पित्याने तुमचा विरोध करावा असे तुम्हाला वाटते काय? अशी तुमची इच्छा आहे काय? जर आपण सया मार्गाने गेलो तर, दीन व नम्र लोकांना परमेश्वरांकडून जी मदत प्राप्त होणार आहे, ती आपण प्राप्त करू शकणार नाही. आणि हे सुद्धा लक्षात ठेवा की त्याचे कारण असणार ***''तुमचा गर्विष्ठपणा व अभिमान''*** ख्रिस्ती जीवनात ***''अयशस्वी होणे व पराभव होणे''*** या गोष्टींच्या मूळाशी ***''गर्वच''*** आहे.

५:६ - याकोब ४:१०

***''योग्य वेळी''*** - तो तरूणांशीच बोलत आहे (वचन ५) योग्य वेळ ती नाही जी आपण समजतो, पण जिला स्वर्गिक पिता योग्य समजतात. लहान सहान गोष्टीत तरूणांनी घाबरू नये किंवा अडू नये. लहान-लहान गोष्टींत त्यांनी आपल्या विश्वासूपणाची साक्ष दयावी. (लूक १६:१०). परमेश्वरांच्या या पद्धतीसाठी व योग्य वेळेची निवड करण्यासाठी देवबापांची वाट पहा. (स्तोत्र ७५:४,७; ३१:१५).

५:७ - स्तोत्र ५५:२२; मत्तय ६:३३,३४; फिलि ४:६,७.

***''काळजी करतात''*** - मत्तय ६:३०; इब्री २:६-८; फिलि ४:१९. ज्याप्रमाणे वडील आपल्या लेकराविषयी विचार करतात, त्याचप्रमाणे परमेश्वर आपल्या विषयी विचार करतात. चिंता करणे म्हणजे स्वतःला पीडा देणे होय व त्याचबरोबर देवबापांचा अनादर करणे सुद्धा होय. आपली चिंता त्यांच्यावर टाकणे म्हणजे आपले ओझे त्यांच्याजवळ आणणे. आपण त्यांच्या चांगलेपणावर, बुद्धिमत्तेवर व स्वर्गिक ज्ञानावर पूर्ण भरवसा, खंबीरपणे ठेवावा. आपला विश्वास असावा की, परमेश्वर आपल्या कल्याणासाठी सर्वकाही करतील.

५:८ - ***''नियंत्रणात''*** - ग्रीक शब्दाचा अर्थ आहे ***''जागे राहणे''*** परंतु याचा अर्थ ***''आत्मसंयमी किंवा सतर्क असणे''*** असा आहे. ख्रिस्ती जीवनाच्या प्रतिकूल जाणाऱ्या कोणत्याच गोष्टीद्वारे प्रभावित होऊ नये. १:१३; ४:७; नीति २५:२८; गल ५:२३; १थेस्स ५:६-८; २पेत्र १:६.

***''जागे रहा/सावध रहा''*** - इफि ६:१८; १थेस्स ५:६. जे आत्मिक रीतिने झोपलेले आहेत किंवा स्वतःमध्ये रमलेले आहेत अशा प्रकारच्या सर्व लोकांवर सैतान नियंत्रण ठेवू शकतो किंवा ठेवतो. मत्तय ४:१ यात सैनातावरचे नोट्स पहा. सैतान परमेश्वरांसारखा, एकाच वेळी सर्व ठिकाणी राहू शकत नाही म्हणून त्याला इकडे-तिकडे भटकावे लागते. जरी तो सिंहासारखा येतो, तरीहि जेव्हा विश्वासयोग्य विश्वासूंचा सामना करतो तेव्हा तो त्यांना भितो व त्यांच्यापासून दूर पळतो. (याकोब ४:७) विश्वासू सैतानाला आपल्या पायाखाली ठेचू शकतात. (स्तोत्र ९१:१३).

५:९ - ***''त्याचा सामना करा''*** - इफि ६:१०-१८. जर आपण त्याचा सामना निर्भयपणे केला तर आपण सैतानाच्या परीक्षेत

मजबूत, दृढ़ राहून, त्याचा सामना करा आणि लक्षात ठेवा की तुमचे भाऊ देखील, जे या जगात
१० आहेत, ते याच प्रकारची पीडा सहन करत आहेत. **तुम्ही** थोडा वेळ दुःख सहन केल्यानंतर कृपेचे
परमेश्वर, ज्यांनी तुम्हाला ख्रिस्तात सार्वकालिक गौरवासाठी बोलवले आहे. ते स्वतः तुम्हाला सिद्ध,
११,१२ मजबूत, सबळ व स्थिर करतील. **त्यांचाच** अधिकार शासन युगानुयुग आहे. **मी** सिलवान याच्या
हाताने ज्याला मी विश्वासयोग्य भाऊ समजतो, थोडक्यात लिहून, तुम्हाला समजवले आहे आणि ही
१३ साक्ष दिली आहे की, देवबापांची कृपा हीच आहे, त्यात दृढ़ रहा. **तुमच्यासारखे** निवडलेले लोक जे
१४,१५ बाबेलात (ईराक) आहेत, **आणि** माझा मुलगा मार्क तुम्हाला सलाम सांगतो. **प्रीतिच्या** चुंबनाने
एकमेकांस सलाम करा. तुम्हा सर्वांना, ज्यांनी येशूंना ग्रहण केले आहे, शांति प्राप्त होवो.

---

व त्याच्या युक्तित फसूच हे आवश्यक नाही. (१योहान ४:४; १करिं १०:१३).

*"दुःख"* - जेव्हा आपली परीक्षा व पारख होते, तेव्हा असे वाटते की, आपण एकटे आहोत, पण तसे नाही कारण सर्वच विश्वासूंना याचा सामना करावा लागतो.

५:१० - *"कृपा"* - योहान १:१४,१६,१७; प्रेषित १५:११; २०:२४,३२; रोम १:७; ३:२४; ५:२१; २करिं ८:९; ९:८; इफि २:९:८-१०.

*"बोलवले"* - २:९; ३:९; रोम १:६,७; ८:२८-३०; ११:२९; इफि ४:१; इब्री ३:१; २पेत्र १:१०.

*"महिमा/गौरव"* - योहान १७:२४; रोम ५:२; ८:१७.

*"ख्रिस्तात"* - रोम ६:३-८ चे नोट्स पहा. इफि १:१,३.

*"दुःख सहन केल्यानंतर"* - १:६; ४:१,१२. दुःखानंतर गौरव प्राप्त होईल. येशूंच्या बाबतीत तसेच झाले (१:११) हीच पद्धत विश्वासूंसाठी (शिष्यांसाठी) परमेश्वरांनी नियुक्त केली आहे. जे लोक परीक्षा व पीडेतून जातात, त्यांच्याठी देवबाप काय करतात ते पहा. स्तोत्र ६६:१२ शी तुलना करा. त्यांतून सुरक्षित बाहेर आणण्याची व पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली बनवण्याची प्रतिज्ञा परमेश्वर करतात.

५:१२ - *"सिलवानच्या हाताने"* - तुलना करा. रोम १६:२२; १करिं १:१; २करिं १:१; फिलि १:१; कल १:१; सिलवान व सिला एकच व्यक्ति आहे. प्रेषित १५:२२; २करिं १:१९; १थेस्स १:१.

*"देवबापांची कृपा"* - पित्याची कृपा हा या पत्रातील अनेक विषयांपैकी एक महत्वाचा विषय आहे. १:२,१०,१३; ४:१०; ५:५,१०. केवळ परमेश्वरांच्या कृपेने तारण प्राप्त होते व त्याच कृपेमुळे तारण झालेले लोक गौरव प्राप्त करतात.

५:१३ - जो बाबेल (ईराक) येथे आहे - उत्पत्ति १०:१०; २राजा १७:२४; यश १३:१; यिर्म ५०-५२ अध्याय. मिसर देशात त्या काळी बाबेल नावाचे एक मिलिट्री स्टेशन (सेनेची छावणी) सुद्धा होते. अनेक टिकाकारांचा विचार असा आहे की, पेत्र रोमकडे संकेत करत होता, पण या गोष्टीचे कोणतेच प्रमाण नाही. जर त्याने रोम येथून हे लिहिले तर त्याने स्पष्टपणे या गोष्टीचा उल्लेख का केला नाही?

"मार्क" - प्रेषित १२:१२,२५; कल ४:१०; २तीम ४:११. पेत्र मार्कला, आपला आत्मिक पुत्र समजत होता. तुलना करा १ तीम १:२.

५:१४ - *"प्रीति"* - अलौकिक प्रेम - अगापे - १करिं १३:१चे नोट्स पहा.

*"चुंबन"* - रोम १६:१६; १करिं १६:२०.

*"शांति"* - लूक १:७९; २:१४; योहान १४:२७; रोम १:७. जे ख्रिस्तात नाहीत त्यांच्याजवळ खरी शांति होऊच शकत नाही.